पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई । वर्ष: 06 । अंक: 5 । 1 मार्च, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.

# अब की बार 400 पार!





## अध्यक्षीय मनोगत

# अब की बार 400 पार!


पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांच्या चैतन्यमयी उपस्थितीत नवी दिल्ली येथे भारतीय जनता पार्टीची दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद पार पडली. मोदीजींच्या समारोपीय संबोधनानंतर नवी प्रेरणा आणि स्फूर्ती घेऊन परिषदेला आलेले दहा हजारापेक्षा अधिक भाजपा नेते कार्यकर्ते नवी दिल्लीतून परतले. देशातील जनतेने मोठ्या अपेक्षेने २०१४ साली मोदीजींना जनादेश दिला. मोदीजींच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत मिळाले. देशाच्या इतिहासात १९८४ नंतर प्रथमच एखाद्या पक्षाला जनतेने पूर्ण बहुमत दिले. मोदी सरकारने २०१४ ते २०१९ या कालावधीत विलक्षण कामगिरी केली. गरीब कल्याण, पायाभूत सुविधांचा विकास, देशाचे संरक्षण आणि आर्थिक प्रगती या बाबतीत मोदी सरकारची कामगिरी जनतेच्या पसंतीला उतरली. या पार्श्वभूमीवर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत जनतेने मोदीजींना अधिक मते आणि अधिक खासदारांसह पुन्हा आशिर्वाद दिला. त्यानंतरच्या पाच वर्षातील मोदी सरकारची कामगिरी पुन्हा एकदा सर्व आघाड्यांवर चांगली झाली. विशेषतः राम मंदिर उभारणी आणि ३७० कलम हटविणे यासारखे ऐतिहासिक कार्य या कालावधीत झाले. जनतेने पुन्हा एकदा मोदीजींना पंतप्रधान करण्याचा निर्धार केला आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील राष्ट्रीय परिषद झाली. २०२४ च्या यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचा निर्धार आहे की, भाजपाने ३७० पेक्षा अधिक जागा जिंकून देशाच्या एकात्मतेसाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना आदरांजली अर्पण करणे. त्याचसोबत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने चारशे जागांचा टप्पा ओलांडणे. अब की बार, चार सौ पार! मोदीजींच्या नेतृत्वात आपल्याला हे उद्दीष्ट गाठायचे आहे आणि विजयाच्या हॅटट्रिकचा इतिहास घडवायचा आहे. आपापल्या मतदारसंघातील उमेदवार भाजपाचा असो किंवा महायुतीतील मित्रपक्षाचा असो, प्रत्येक ठिकाणी आपल्याला विजय मिळवायचा आहे. देशभरातून सर्वत्र भाजपाला मोठा विजय मिळत असताना त्यामध्ये महाराष्ट्राचा मोलाचा सहभाग असला पाहिजे. भाजपाने पुन्हा निवडणूक जिंकून देशाच्या विकासासाठी कसे काम करायचे आहे, याचा आराखडा या राष्ट्रीय परिषदेत स्पष्ट झाला. विकसित भारत घडविण्याची गॅरंटी मोदीजींनी दिली आहे. हाच आपला मंत्र आहे. राष्ट्रीय परिषदेत मा. भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डाजी, मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मा. संरक्षण मंत्री राजनाथसिंह, मा. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह प्रमुख नेत्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. बैठकीत मांडलेल्या प्रस्तावातून वैचारिक भूमिका स्पष्ट झाली. या महत्त्वाच्या परिषदेमुळे वैचारिकदृष्ट्या भाजपा सज्ज झाला. आता पूर्ण शक्ती पणाला लाऊ आणि आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि मित्रपक्षांना विजय मिळवून देऊ. भारताला विकसित राष्ट्र करण्यासाठी हा विजय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. मोदीजींच्या नेतृत्वात शेतकरी, महिला, युवा आणि गरीब या चार घटकांना विकासाच्या बाबतीत सर्वाधिक प्राधान्य देतानाच भारताला सर्व क्षेत्रात विकसित राष्ट्र बनवायचे आहे. या ऐतिहासिक कार्यात आपल्याला सहभागी होता आले, हे आपले भाग्य आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०४ लक्ष्य 400+




०८ घराणेशाही टिकवण्यासाठी इंडी आघाडीची लढाई



१० आम्ही ईश्वरी कार्याचे उपासक...!



१६ दळणवळणातून विकासाला 'गतिशक्ती'



१९ देशात 2 लाखांपेक्षा जास्त नागरिक करोडपती



२५ एक कोटी आयुष्मान कार्ड वितरणाचा प्रारंभ






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# लक्ष्य 400+




● पंतप्रधान नरेंद्र मोदी

केवळ राजकारण नव्हे तर राष्ट्रकारण करणारे छत्रपती शिवाजी महाराज माझे आदर्श आहेत. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही सदैव कार्यरत राहू, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच संपन्न झाले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना विजयाचा मंत्र दिला. ते म्हणाले, गेली दहा वर्षे देशासाठी परिवर्तनाची ठरली आहेत. पुढील पाच वर्षे देखील अतिशय महत्वाच्या निर्णयांची ठरणार आहेत. त्यामुळे सत्तेसाठी नव्हे तर देशसेवेसाठी सलग तिसऱ्यांदा सत्ता गरजेची आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या राज्याभिषेकानंतर स्वस्थ बसले नाहीत, तर त्यांनी आपले राजकारण आणि त्यातून राष्ट्रकारण सुरूच ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराज हेच आपले आदर्श असून त्यांच्या राष्ट्रकारणावरच वाटचाल करण्यावर आपण भर देत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले. *पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अधिवेशनात केलेल्या भाषणातील प्रमुख मुद्दे.*

▶▶आगामी १०० दिवसांत आपण प्रत्येक नवमतदारांपर्यंत पोहचण्याचा निर्धार करायचा आहे.

▶▶त्याचबरोबर आपल्या सरकारच्या प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत, समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत आपण येत्या १०० दिवसांत पोहचले पाहिजे.

▶▶केवळ राजकारण नव्हे तर राष्ट्रकारण करणारे छत्रपती शिवाजी महाराज माझे आदर्श आहेत. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न साध्य करण्यासाठी आम्ही सदैव कार्यरत राहू, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून आम्ही काम करत आहोत. शिवाजी महाराजांनी सत्तेचा कधीच उपभोग घेतला नाही. त्यांचे राज्य रयतेसाठी समर्पित होते. स्व-राज्य हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ध्येय होते.

▶▶आम्हाला सत्ता उपभोगण्यासाठी नको आहे. आम्हाला समर्थ, विकसित भारत घडवायचा आहे त्यासाठी आम्ही जनतेकडे जात आहोत.

▶▶कोट्यवधी तरुण, महिला, गोरगरीब यांचे स्वप्न साकार करण्यासाठी आम्हाला सत्तेचा वापर करायचा आहे. युवक, महिला, शेतकरी यांनी देशाच्या विकासात आपला वाटा उचलावा यासाठी आम्ही गेल्या दहा वर्षांत प्रयत्न केले आहेत. गोरगरिबांना वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून अर्थसाह्य केले. आता हे घटक देशाच्या विकासात योगदान देत आहेत.

▶▶महिलांच्या विकासाकडे आमच्या सरकारने विशेष लक्ष दिले आहे. महिला सशक्तीकरणासाठी आमच्या सरकारने अनेक निर्णय घेतले. बेटी बचाओ, बेटी पढाओ, लखपती दीदी, मातृत्व वंदना अशा अनेक योजनांतून नारी शक्तीला आमच्या सरकारने बळ दिले. मुद्रा योजनेतून मिळणाऱ्या कर्जाचा सर्वाधिक लाभ महिला वर्गाला झाला आहे.

▶▶स्वच्छता अभियानासारखा विषय मी लाल किल्ल्यावरून मांडला. आता स्वच्छता अभियानाचे महत्व सामान्य माणसाला कळू लागले आहे.

▶▶वर्षानुवर्षे लोंबकळत पडलेले प्रश्न आमच्या सरकारने मार्गी लावले. राम मंदिरासाठी ५०० वर्षे लढा चालू होता. आमच्या सरकारने हा प्रश्न मार्गी लावण्याचे धाडस केले. गुजरातमधील पावागढ येथील मंदिरावर ५०० वर्षांनी धर्मध्वज फडकला. ७० वर्षांनंतर कर्तारपूर कॉरिडॉर आम्ही खुला केला. ३७० कलम रद्द करावे या मागणीसाठी १९५१ पासून संघर्ष सुरु होता. आमच्या सरकारने हे कलम रद्द केले.

▶▶वन रँक वन पेन्शन सारखे सैनिकांशी संबंधित विषय आमच्या सरकारनेच मार्गी लावले.

▶▶आता आमच्या सरकारने भारताला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनविण्याचा निर्धार केला आहे. देशातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अत्याधुनिक करण्याचा आमच्या सरकारचा निर्धार आहे. प्रगत देशांमध्ये ज्या सोयी सुविधा असतात त्या भारतातील नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.

▶▶गेली दहा वर्षे देशासाठी परिवर्तनाची ठरली

## कमळ हाच आपला उमेदवार

**कमळाचे फुल हाच भाजपाचा उमेदवार असणार आहे, हे कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवावे. पक्ष जो उमेदवार देईल, त्याला निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले पाहिजे. या अधिवेशनातून परत जाताना आपण सर्वांनी हाच निर्धार करून परतायचे आहे. पुढचे १०० दिवस कार्यकर्त्यांनी पक्षाला समर्पित करायचे आहेत. येत्या १०० दिवसांत प्रचंड मेहनत घ्या आणि पक्षाला ३७० जागा मिळवून द्या. हीच जनसंघाचे संस्थापक डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांना आदरांजली ठरणार आहे.**

## काँग्रेसने लष्करावरही आरोप केले

**काँग्रेसने देशाच्या लष्कराचं मनोबल तोडण्यासही ते मागे पाहिले नाही. देशाची राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक शक्तीला नुकसान पोहोचण्यासाठी काँग्रेसने कोणतीही कसर सोडली नाही. देशाच्या सुरक्षेवर जेव्हा प्रश्नचिन्ह उभे राहिले, आपल्या लष्कराने जेव्हा मोठं यश संपादन केलं, तेव्हा प्रत्येकवेळी काँग्रेसने त्यांच्यावर प्रश्न उपस्थित केले. तुम्ही फक्त विचार करा की पाच वर्षांपूर्वी काय म्हटलं होतं, या लोकांनी राफेलसारखे एअराक्राप्ट न मिळण्यासाठी प्रयत्न केले. सर्जिकल स्ट्राईकवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. एअर स्ट्राईकच्या वेळी त्यांच्या यशस्वीतेचे प्रमाणपत्र मागितले गेले.**

## जगालाही विश्वास 'आएगा तो मोदीही'

**आज जगातील प्रत्येक देश भारताशी सखोल संबंध निर्माण करण्यावर भर देत आहे. निवडणुका अजून बाकी आहेत, मात्र मला जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरपर्यंत वेगवेगळ्या देशांतून आमंत्रणे आहेत. याचाच अर्थ जगातील विविध देशांनाही भाजप सरकारच्या पुनरागमनावर पूर्ण विश्वास आहे. जगातल्या प्रत्येक देशालाही 'आएगा तो मोदीही' असा विश्वास असल्याचे पंतप्रधान म्हणाले.**

आहेत. पुढील पाच वर्षेदेखील अतिशय महत्वाच्या निर्णयांची ठरणार आहेत. त्यामुळे सत्तेसाठी नव्हे तर देशसेवेसाठी सलग तिसऱ्यांदा सत्ता गरजेची आहे.

▶▶स्वातंत्र्यानंतर केवळ काही कुटुंबाकडेच सत्ता राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सत्तेची पदे आपल्याच मित्रमंडळीत वाटण्यात येत होती. मात्र, भाजपने या राजकारणास छेद दिला आणि गुणवत्तेस प्राधान्य देण्यास सुरुवात केली.

▶▶समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाचे राजकारण भाजपने सुरू केले आहे. परिणामी गेल्या दहा वर्षांपासून देशात वेगवान विकासाचे पर्व सुरू झाले आहे. भारतास २०४७ सालापर्यंत विकसित बनविण्याचे लक्ष्य त्यातूनच साध्य होईल.

▶▶काँग्रेसपासून देशाचे आणि देशातील नागरिकांचे भवितव्य वाचवणे गरजेचे आहे. अस्थिरता, घराणेशाही, लांगूलचालन, मतपेढीचे राजकारण आणि भ्रष्टाचार याची जननी काँग्रेस पक्ष आहे. काँग्रेस आणि त्यांची 'इंडी' आघाडी ७० च्या दशकाप्रमाणे आजही भाषा आणि प्रांतवाद उभा करून देश तोडण्यासाठी नवनवे षड्यंत्र रचत आहेत. सैन्याचे मनोबल तोडणे, राष्ट्रीय सुरक्षेस तडा देणे हेच त्यांचे धोरण राहिले आहे. काँग्रेसकडे वैचारिक लढा देण्याचे सामर्थ्य आता उरलेले नाही, त्यामुळे मला शिवीगाळ करणे आणि द्वेष करणे एवढेच त्यांच्या हाती उरले आहे.


▶▶भाजप कार्यकर्ता हा ३६५ दिवस २४ तास कार्यरत राहतो. भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने पुढील १०० दिवस नव्या मतदारांशी संपर्क करावा, विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधावा, प्रत्येक घरात 'प्रधानसेवक नरेंद्र मोदी' यांचा नमस्कार पोहोचवा, भाजपचा द्वेष करणाऱ्यालही भाजपसोबत जोडून घ्या आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे सरकार स्थापन करण्यासाठी नव्हे तर राष्ट्रनिर्माणासाठी जनतेला भाजपसोबत जोडा.

▶▶हताश झालेले विरोधकही 'अबकी बार, ४०० पार' म्हणू लागले आहेत. त्यांनी आपला विजय निवडणुकीच्या युद्धाआधीच मान्य केला आहे.


▶▶अजून निवडणुका जाहीर झाल्या नाहीत. पण मला जगभरातून जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची आमंत्रणे आली आहेत. याचा अर्थ जगभरातील विभिन्न देशांनाही भाजपा सरकारवर विश्वास आहे. जगातील प्रत्येक शक्तीला माहित आहे की येणार तर मोदीच.

▶▶काँग्रेसचं सर्वांत मोठं पाप देशाच्या लष्कराचं मनोबल खच्ची करण्यासाठी केलेले प्रयत्न हे आहे. देशाची राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक शक्तीला नुकसान पोहोचवण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. देशाच्या सुरक्षेवर जेव्हा प्रश्नचिन्ह उभे राहिले, आपल्या लष्कराने जेव्हा कोणतं यश संपादन केलं, तेव्हा प्रत्येकवेळी काँग्रेसने त्यांच्यावर प्रश्न उपस्थित केले. तुम्ही फक्त विचार करा की पाच वर्षांपूर्वी काय म्हटलं होतं की, या लोकांनी राफेलसारखे लढाऊ विमान देशाला न मिळण्यासाठी प्रयत्न केले. सर्जिकल स्ट्राईकवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. एअर स्ट्राईकच्या वेळी त्यांच्या यशस्वीतेचे प्रमाणपत्र मागितले गेले. काँग्रेस प्रचंड गोंधळलेली आहे.

▶▶काँग्रेसमध्ये वाद सुरू आहेत, मोठा वाद सुरू आहे. योजनांसाठी हा वाद नाहीय. काँग्रेसमध्ये एक वर्ग आहे जो म्हणतो मोदींवर तिखट आरोप करा, व्यक्तिगत आरोप करा. त्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी प्रयत्न करा. तर दुसरा वर्गात काँग्रेसचे मूळ परंपरांगत लोक आहेत. ते म्हणतात की काँग्रेसमधील मोदीविरोध बाहेर काढा. यामुळे काँग्रेसला सर्वाधिक फायदा होईल. म्हणजेच, काँग्रेस सैद्धांतिक मुद्द्यावर लढत नाही. काँग्रेस एवढी हताश आहे की त्यांच्यात सैद्धांतिक आणि वैचारिक विरोध करण्यासाठी त्यांच्यात साहस नाही. त्यामुळे शिव्या आणि खोटे आरोप करणे हाच एकमेव त्यांचा अजेंडा आहे.



नवी दिल्ली येथे प्रगती मैदानावर भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अधिवेशनात राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते.








नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच पार पडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अधिवेशनात उपस्थित कार्यकर्त्यांना निवडणुकीत ३७० जागांचे लक्ष्य साध्य करण्यासाठी जोमाने कामाला लागण्याचा आदेश दिला. त्यांचा हा आदेश पाळण्याचा निर्धार करतच उपस्थित प्रतिनिधी दिल्लीहून परतले.



▸▸ विरोधी पक्षांना सत्तेवर असताना विकास योजना पूर्ण करता आल्या नव्हत्या. त्यांच्या काळात अनेक प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले. मात्र, खोटी आश्वासनं देण्यात त्यांना तोड नाही. विकसित भारताचा संकल्प करायला विरोधी पक्षांचे नेते घाबरतात. भाजप आणि एनडीएनं विकसित भारताचं स्वप्न पाहिलं आहे.

▸▸ लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात विरोधक भावनिक मुद्दे उपस्थित करतील. पण त्याकडे दुर्लक्ष करा आणि गरीब कल्याणाच्या आपल्या योजनांची माहिती मतदारांपर्यंत पोहचविण्यावर भर द्या. ■

# घराणेशाही टिकवण्यासाठी इंडी आघाडीची लढाई

● अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री

दिल्लीत सुरू असलेल्या भाजपच्या दोन दिवसीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. श्री. नड्डा यांनी अयोध्येतील रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठपणेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अभिनंदन केले आणि श्री राम मंदिराच्या उभारणीचा प्रस्ताव मांडला. त्याचवेळी अमित शहा यांनी काँग्रेस आणि इंडी आघाडीविरोधात प्रस्ताव मांडला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'भाजप ही देशाची आशा आणि विरोधकांची निराशा' असा प्रस्ताव मांडला. ते म्हणाले, पांडव आणि कौरवांप्रमाणेच निवडणुकीपूर्वी दोन छावण्या आहेत.



**एकीकडे** मोदीजींच्या नेतृत्वाखाली एनडीएची युती आहे तर दुसरीकडे काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सर्व घराणेशाही पक्षांची अहंकारी आघाडी आहे. ही अहंकारी युती भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरणाच्या राजकारणाला खतपाणी घालते. तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे काँग्रेसने राम मंदिराचे निमंत्रण नाकारल्याचे श्री. शहा म्हणाले. ते पुढे म्हणाले, बडे मियाँ ते बडे मियाँ, छोटे मियाँ सुभान अल्लाह अशी एक म्हण आहे. आम आदमी पार्टी अनेक घोटाळे करत न्यायालयापासून दूर पळत आहे. छत्तीसगडमध्ये महादेव घोटाळा झाला. लालूजींना शिक्षा झाली आहे. संपूर्ण इंडी आघाडी भ्रष्टाचारात गुंतलेली आहे. आता देशातील जनतेने निर्णय घ्यायचा आहे की मोदींना जनादेश द्यायचा की इंडी आघाडीला.

## देशाच्या महानतेस काँग्रेसने नाकारले

**काँग्रेसने श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा निमंत्रण नाकारून केवळ ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होणेच नाकारले नसून देशाला महान बनवण्याच्या प्रक्रियेपासूनही अंतर राखले आहे. मात्र, देशातील जनता सर्वकाही पाहत असून लक्षातही ठेवत आहे, असा इशारा शाह यांनी काँग्रेसला दिला.**

श्री. अमित शाह म्हणाले की, ७५ वर्षात या देशाने १७ लोकसभा निवडणुका, २२ सरकारे आणि १५ पंतप्रधान पाहिले आहेत. प्रत्येक सरकारने आपल्या काळात विकासासाठी प्रयत्न केले. आज मी निःसंशयपणे सांगू शकतो की सर्वांगीण विकास, प्रत्येक क्षेत्राचा विकास आणि प्रत्येक व्यक्तीचा विकास नरेंद्र मोदीजींच्या १० वर्षातच झाला आहे. मोदीजींनी अवघ्या १० वर्षात घराणेशाही, जातिवाद आणि तुष्टीकरण संपवले. घराणेशाहीवर निशाणा साधत अमित शहा म्हणाले, राजकारणात इंडी आघाडीचा उद्देश काय आहे?

# भारत दहशतवाद, नक्षलवाद आणि फुटीरतावादमुक्त होणार

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थ तिसऱ्या कार्यकाळात भारत दहशतवाद, नक्षलवाद आणि फुटीरतावादमुक्त होईल, असा विश्वास देशाचे गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी भाजप राष्ट्रीय अधिवेशनात व्यक्त केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी 'भाजप – देश की आशा, विपक्ष की हताशा' असा प्रस्ताव राष्ट्रीय अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मांडला. यावेळी ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशास सामूहिक न्यूनगंडातून बाहेर काढले. गुलामगिरीच्या प्रतिकांपासून सुटका करून विकासाचे राजकारण प्रस्थापित केले. गेल्या १० वर्षांत देशाचा चौफेर विकास झाला आहे. त्याचप्रमाणे आता दहशतवाद, नक्षलवाद आणि फुटीरतावाद अखेरचा श्वास मोजत असून पंतप्रधान मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळात भारत या तिन्ही समस्यांपासून मुक्त होईल; अशी ग्वाही गृहमंत्री शाह यांनी दिली. देशात महाभारतातप्रमाणे दोन गट पडले असल्याचे शाह यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, पहिला गट म्हणजे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील घमंडीया आघाडीचा आणि दुसरा म्हणजे भाजप आणि मोदींच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा. देशातील भ्रष्टाचाराचा जनक असलेल्या काँग्रेस पक्षाचे साथीदारही भ्रष्टाचारीच आहेत. भ्रष्टाचाराचे पोषण करण्याचे काम काँग्रेसने केले आहे. काँग्रेसने जमीन – पाणी – पाताळ आणि अंतराळातही भ्रष्टाचार केला आहे. त्याउलट गेली १० वर्षे आणि त्यापूर्वीही १३ वर्षे नरेंद्र मोदी यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही. काँग्रेसची सर्व आंदोलने ही सत्तेसाठी असतात तर भाजपचे प्रत्येक आंदोलन हे देशासाठी असते. त्यामुळे राष्ट्रविकास हेच भाजपचे धोरण आहे, असेही गृहमंत्री शाह यांनी यावेळी नमूद केले.**




## तीन महिन्यांची सुटी विरूध्द २३ वर्षे अविरत काम

**एकीकडे दरवर्षी परदेशात तब्बल ३ महिने सुटी घालवण्यासाठी जाणारे आणि घराणेशाहीचे नेते राहुल गांधी आहेत तर दुसरीकडे गेली २३ वर्षे एकही दिवस सुटी न घेता जनसेवा करणारे आणि विकासाची आघाडी सांभाळणारे नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आहे. त्यामुळे देशातील जनता योग्यच निर्णय घेईल, असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला.**

## मुलांचे कल्याण हेच एकमेव लक्ष्य

**सोनिया गांधींना आपल्या मुलास पंतप्रधान करायचे आहे, शरद पवारांना आपल्या मुलीस, ममतांना आपल्या पुतण्यास मुख्यमंत्री करायचे आहे. तसेच उद्धव ठाकरे यांना आपल्या मुलास, स्टॅलिन यांना आपल्या मुलास आणि लालूंनाही आपल्या मुलास मुख्यमंत्री करायचे आहे. त्यामुळे या एका कुटुंबाच्या पक्षांना देशाच्या विकासाशी देणेघेणे नाही, असा टोला शाह यांना लगावला.**

आत्मनिर्भर भारत हे पंतप्रधान मोदींचे ध्येय आहे. राहुल गांधींना पंतप्रधान करणे हे सोनिया गांधींचे उद्दिष्ट आहे. आपल्या मुलीला मुख्यमंत्री करणे हे पवार साहेबांचे ध्येय आहे. आपल्या पुतण्याला मुख्यमंत्री बनवणे हे ममता बॅनर्जींचे उद्दिष्ट आहे. आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवणे हे स्टॅलिनचे उद्दिष्ट आहे. प्रादेशिक पक्षांच्या घराणेशाहीवर निशाणा साधत अमित शहा पुढे म्हणाले की, लालू यादव यांचा उद्देश आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवणे आहे. आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवणे हे उद्धव ठाकरेंचे ध्येय आहे. मुलायमसिंग यादव यांनी आपला मुलगा मुख्यमंत्री होईल याची खात्री केली. ज्यांचे ध्येय आपल्या कुटुंबासाठी सत्ता मिळवणे आहे, ते कधी गरिबांच्या कल्याणाचा विचार करतील का? ■

# आम्ही ईश्वरी कार्याचे उपासक...!




● **चंद्रशेखर बावनकुळे**, प्रदेशाध्यक्ष

> असं म्हणतात, की अनुभवांनी माणूस समृद्ध होतो. विचार प्रगल्भ होतात, आणि संस्कारांचा मुलामा त्यावर चढविला गेला की मनाची श्रीमंती वाढते. अशा अवस्थेत सेवाभावाचं स्थान सर्वोच्च असतं. भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वांत मोठा पक्ष म्हणून ज्या काही कारणांमुळं सिद्ध झाला आहे, त्यामध्ये कार्यकर्त्यांची वैचारिक प्रगल्भता व त्यातून प्रगत होत गेलेला सेवाभाव यांचं स्थान मोठं आहे.


**केवळ** सत्तेचं राजकारण हे भारतीय जनता पक्षाचं एकमेव लक्ष्य नाही, तर सत्तेच्या माध्यमातून सेवा, राष्ट्रभावाची जोपासना आणि सुशासनाच्या माध्यमातून सुसंस्कृत समाजनिर्मिती हे पक्षाचं प्रथम ध्येय आहे. म्हणूनच, प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि अखेरीस व्यक्ती ही पक्षाची नीती आहे, आणि पक्षाच्या नेत्यापासून कार्यकर्त्यापर्यंत प्रत्येकानं या नीतीस अनुसरूनच आपल्या अंगी स्वयंसेवकत्वाची बीजं जोपासली आहेत.

दिल्लीमध्ये भारतमंडपम मध्ये गेल्या आठवड्यात पार पडलेल्या भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अधिवेशनात पदोपदी या नीतीचा अनुभव येत गेला, आणि पक्षाच्या संस्कारांच्या शिदोरीत या अनुभवाची भर पडली. दिल्लीतील राष्ट्रीय अधिवेशनातील दोन दिवसांच्या उपस्थितीमुळं अभूतपूर्व अनुभवाची शिदोरी घेऊन आम्ही सारे कार्यकर्ते नव्या आव्हानास सामोरं जाण्यास सिद्ध झालो.

हे आव्हान केवळ आगामी निवडणुकीचं नाही. तर, 'एक भारत श्रेष्ठ भारत' या संकल्पाच्या सिद्धीकरिता सज्ज होण्याचं आहे, आणि यासाठी निवडणूक हे तर केवळ एक माध्यम आहे. देशाला परमवैभवाप्रती नेण्याच्या संकल्पाची सुरुवात दहा वर्षांपूर्वी भारतीय जनता पक्षाच्या महाविजयानं झाली होती. हा विजय म्हणजे, देशाच्या वैभवी वाटचालीची जनतेनं पक्षाच्या खांद्यावर विश्वासानं सोपविलेली एक पालखी आहे.

गेल्या दहा वर्षांत भारतीय जनता पक्षाच्या सरकारनं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम, दूरदर्शी आणि समर्थ









नेतृत्वाखाली ज्या विश्वासानं आणि तळमळीनं देशाच्या उत्कर्षाचे नवे राजमार्ग तयार केले. राष्ट्रीय अधिवेशनातील नेत्यांच्या संदेशातून मिळालेला संकल्पमंत्र घेऊन आम्ही सारे जण आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आत्मविश्वासानं सिद्ध झालो आहोत.

जिथं नेता आणि कार्यकर्ता यांतलं अंतर पुसलं जातं, तिथं संघटनेची ताकद द्विगुणित होते. अधिवेशनात हे अंतर पुसलं गेलं. पंतप्रधान, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणंत्री राजनाथ सिंह आदी नेत्यांच्या संपूर्ण उपस्थितीमुळं हे सिद्ध झालं. संघटना ही नेत्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत प्रत्येकाची सर्वोच्च प्राथमिकता आहे.

मोदी यांच्यासारखा द्रष्टा, सेवाभावी आणि संकल्पशील नेता स्वातंत्र्याच्या अमृतकाळात देशाला लाभला, 'आणि

देशाच्या उत्कर्षाच्या वैभवी वाटचालीची दिशा आणि दृष्टी देण्यासाठी पक्षाला त्यांचे अखंड मार्गदर्शन लाभलं हा पक्षासाठी भाग्यशाली संकेत ठरला आहे.

येत्या काळातील, पुढच्या शंभर दिवसांतील दिनचर्येचं एक वेळापत्रकच मोदींनी या वेळी आखून दिलं आहे. देशातील प्रत्येक मतदाराशी संपर्क हा प्रत्येक कार्यकर्त्याचा संकल्प राहणार आहे, आणि मोदी सरकारच्या गेल्या दहा वर्षांतील जनहिताच्या अनेक निर्णयांच्या लाभार्थींची साथ घेऊन समाजातील वंचितांसाठी उत्कर्षाच्या नव्या वाटचालीचा प्रारंभ करावयाचा आहे.

जेव्हा सारे मिळून समर्पित भावनेनं काम करतील, तेव्हा भाजपला सर्वाधिक जागा मिळतीलच, पण त्या नव्या शक्तीनिशी देशाच्या प्रगतीला बळ येईल, हा विश्वास मोदींनी त्यांच्या भाषणातून मनामनात जागविला आहे. गेल्या दहा वर्षांत देशानं प्राप्त केलेल्या प्रगतीची गती अभूतपूर्व अशी आहे. त्यामुळं, जनतेचा आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचा विश्वास वाढला आहे.

देशानं आज अनेक क्षेत्रांत मिळविलेल्या तेजस्वी यशाचा डंका जगभर गाजतो आहे, आणि मोदीजींच्या दूरदृष्टीमुळं प्रगती आणि संस्कृती यांचा सुंदर संगम जगाला भारतामध्ये पाहावयास मिळतो आहे. जेव्हा संकल्प भव्यदिव्य असतात, तेव्हा त्यांचं यश देखील भव्यदिव्य असतं. भारताला विकसित राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर मानाचं स्थान मिळवून देण्याचा आपला संकल्प आहे, असा मंत्र त्या दिवशी मोदी यांनी कार्यकर्त्यांच्या मनात पेरला आहे.

हा केवळ विचार नाही, तर कृतीचा संदेश आहे. येत्या पाच वर्षांत त्या दृष्टीनं प्रत्येक कार्यकर्त्यास मोठी झेप घ्यावी लागेल, विकसित भारताच्या संकल्पसिद्धीसाठी पक्षाला पुन्हा एकदा अधिक शक्तिशाली स्वरूपात सत्ता मिळवून देण्याचा संकल्प मनोमनी घेऊन आम्ही सारे कार्यकर्ते दिल्लीच्या अधिवेशनातून परतलो आहोत.

दहा वर्षांच्या स्वच्छ, पारदर्शक आणि प्रामाणिक कार्यकाळानं कायापालटाच्या संकल्पाचं यश अधोरेखित केलंय. देशातील २५ कोटी लोकसंख्येच्या कपाळावरील दारिद्र्याची रेषा पुसली गेली हा केवळ चमत्कार नव्हे. पक्षाचा अंत्योदयाचा मूलमंत्र आणि मोदीच्या नेतृत्वाखालील सरकारचं समर्पित कार्य यांचा तो प्रत्यक्ष परिणाम आहे.

'सबका साथ सबका विकास' ही केवळ निवडणुकीची घोषणा नाही, तर अंमलबजावणीचा संकल्प आहे, हे या यशानं अधोरेखित केलंय. धर्म, पंथ, जात, प्रांतभेदाच्या भिंतींचे अडथळे आता देशाच्या प्रगतीला रोखू शकणार नाहीत, हे या कृतीनं स्पष्ट झालंय. मोदी सरकारची हमी केवळ निवडणूक घोषणापत्रातून नव्हे, केवळ पोकळ भाषणांतून नव्हे, आणि काँग्रेसी संस्कृतीच्या लांगुलचालनी लाचारीतून नव्हे, तर कृतीतून प्रत्यक्षात येते, याविषयी आता जनतेच्या मनात शंका राहिलेली नाही.

म्हणूनच, आता काँग्रेसच्या सत्तापिपासू राजकारणापासून देशाला वाचविण्याची मोदी यांनी प्रत्येक कार्यकर्त्यावर सोपविलेल्या जबाबदारीच्या जाणिवेतून पुढच्या शंभर दिवसांच्या मोहिमा यशस्वी करण्याकरिता आम्ही कटिबद्ध झालो आहोत.

धर्माच्या नावावर समाजामध्ये भेद निर्माण करणे, देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैन्यदलांचं मनोबल खची करणं, राष्ट्रीय सुरक्षिततेसारख्या संवेदनशील मुद्द्यांना दुय्यम स्थान देणारं राजकारण करणं, या काँग्रेसच्या पापांची फळे देश भोगतो आहे. आता देशाला त्यापासून मुक्त करणं हाच आमचा संकल्प आहे. विकलांग झालेल्या काँग्रेसला आता पक्षाच्या आणि जनतेच्या संघटित शक्तीचा एक धक्का पुरेसा ठरणार आहे.

आगामी निवडणुकीत तो धक्का देण्याकरिता पक्ष आणि जनता हातात हात घालून सज्ज झाली आहे. त्यासाठी पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात पंतप्रधानांचे प्रेरणादायी संदेश, पक्षाध्यक्ष नड्डा यांच्या संघटनकौशल्यातून निर्माण झालेली ऊर्जा, मोदी की गॅरंटी या जनतेनं स्वीकारलेल्या परवलीच्या शब्दाचा पुकार, विकसित भारताचं स्वप्न आणि नकारात्मक राजकारण करणाऱ्या काँग्रेसचा संपूर्ण पाडाव करण्याची प्रेरणा घेऊन पुढच्या शंभर दिवसांत उभा देश ढवळून काढण्याचा संकल्प आम्ही सोडला आहे.

अयोध्याधीश प्रभू श्रीरामांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे. भाजप हे देशाचं आशास्थान आहे, आणि विरोधी पक्षांच्या निराशेचं मूळ आहे, म्हणूनच, मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदावर बसविण्याचा देशाचा संकल्प आहे. कोणतीही शक्ती या संकल्पास रोखू शकणार नाही, यासाठी आम्ही जागल्याची भूमिका बजावणार आहोत. कारण, आम्ही या ईश्वरी कार्याचे उपासक आहोत, आणि देशाला परमवैभवाप्रत नेण्याची जबाबदारी आता नियतीनंही आमच्यावर सोपविली आहे. **(शब्दांकन- रघुनाथ पांडे)**

# मोदी सरकारमुळे अर्थव्यवस्थेला गती

यूपीए सरकारच्या १० वर्षाच्या बेशिस्त अर्थव्यवस्थेमुळे, अनेक घोटाळ्यांमुळे, धोरण लकव्यामुळे देशापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. या संकटातून बाहेर काढण्यासाठी मोदी सरकारने गेल्या १० वर्षात अनेक महत्वाचे निर्णय तातडीने घेतले. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत यूपीए सरकारच्या १० वर्षात देशाची अर्थव्यवस्था कशी रसातळाला गेली याबाबतची श्वेतपत्रिका सादर केली होती. या श्वेतपत्रिकेतील महत्वाचे मुद्दे.



▸▸डिजीटल क्रांती–यूपीआयसारखी तंत्रप्रणाली प्रत्यक्षात आणून मोदी सरकारने सामान्य माणसाचे जीवन आणखी सुखकर केले. भाजी विक्रेत्यापासून मॉलपर्यंत यूपीआयचा वापर होतो आहे.

▸▸कोरोना संकटकाळात अनेक प्रगत देशाच्या अर्थव्यवस्था संकटात सापडल्या. मोदी सरकारने या संकटाचे संधीत रूपांतर केले.



▸▸कोरोनावर स्वदेशी लस तयार करून २४० कोटी लस डोस वितरीत केले. भारताची लसीकरण मोहीम जगात विक्रमी ठरली.



▸▸मोदी सरकार सत्तेत आले त्यावेळी दिवसाला १२ किलोमीटर एवढ्या लांबीचे महामार्ग बांधले जात होते. आता दिवसाला महामार्ग बांधणीचा वेग दुपटीने वाढून तो २८ किलोमीटर एवढा झाला आहे.

▸▸जम्मू–काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, ईशान्य भारत या सीमावर्ती भागात रस्ते, बोगदे, पूल, रेल्वे या पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे.



▸▸अंत्योदयाची संकल्पना प्रत्यक्षात आणत गोरगरीब, वंचित वर्गासाठी परवडणाऱ्या दरात घरे बांधून दिली जात आहेत. पंतप्रधान आवास योजनेखाली गेल्या ८ वर्षात २.६ कोटी एवढी घरे बांधण्यात आली.

▸▸स्वच्छता अभियानात गेल्या १० वर्षात सुमारे १२ कोटी शौचालय गोरगरिबांसाठी बांधून देण्यात आली.





▸▸जन–धन योजनेत गेल्या १० वर्षात ५१.६ कोटी एवढी खाती उघडण्यात आली.

▸▸केंद्र सरकारच्या

गोरगरिबांसाठीच्या योजनांचे अनुदान जन-धन योजनेमुळे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होऊ लागले आहे.




▸▸गोरगरिबांना स्वस्त दरात औषधे मिळावीत, यासाठी गेल्या ९ वर्षात देशभर १० हजार जनऔषधी केंद्र सुरू करण्यात आली आहेत.

▸▸मातृ वंदना योजनेत गर्भवती महिलांना अनुदान दिले जाते. वंचित वर्गातील ३.५९ कोटी महिलांना अनुदान दिले गेले आहे.

▸▸पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेत दरवर्षी ६ हजार रुपये इतके अर्थसहाय्य शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते.

▸▸जीएसटी’सारखी करप्रणाली लागू केल्याने सामान्य माणसाची वेगवेगळ्या करांच्या जंजाळातून सुटका झाली आहे. ‘जीएसटी’मुळे वस्तू आणि सेवांचे दर आटोक्यात राहून महागाईला आळा बसला आहे.



▸▸अर्थव्यवस्थेत आवश्यक सुधारणा केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरील गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे. त्यामुळे गेल्या ८ वर्षात (२०१५ ते २०२३) देशात ५९६.५ बिलीयन डॉलर्स एवढी थेट परकीय गुंतवणूक झाली आहे.

▸▸२००५ ते २०१४ च्या पहिल्या तिमाहीपर्यत देशात ३०५.३ बिलीयन डॉलर्स एवढीथेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) आली होती. यूपीए सरकारच्या काळापेक्षा थेट परकीय गुंतवणुकीत जवळपास दुप्पट वाढ झाली आहे.

▸▸यूवा- ३००० नव्या आयटीआयची करण्यात आली.

▸▸राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० द्वारे परिवर्तनकारक सुधारणा घडवण्यात येत आहेत.

▸▸पीएम स्कूल (पीएम श्री) मध्ये दर्जेदार शिक्षण देत मुलांचा समग्र विकास करण्यात येत आहे. पीएम स्कूलसाठीच्या निधीत वाढ करत ४ हजार कोटी रुपयांवरून ६०५० कोटी करण्यात आला आहे.

▸▸स्किल इंडिया मिशन अंतर्गत १.४ कोटी युवकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. ५४ लाख युवकांच्या कौशल्यात वाढ करण्यात आली आहे.

▸▸उच्च शिक्षण क्षेत्रात मोठ्या संख्येने नव्या संस्था उघडण्यात आल्या. ७ आयआयटी, १६आयआयआयटी, ७ आयआयएम, १५ एम्स आणि ३९० विद्यापीठे उघडण्यात आली आहेत.

▸▸तंत्रप्रेमी युवकांसाठी कोष: ५० वर्षीय व्याज मुक्त कर्जासह एक लाख कोटी रुपयांचास एक कोष स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. या कोषातून खाजगी क्षेत्र, नव्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये संशोधन आणि नव्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल.

▸▸’सबका साथ या मंत्रासह गेल्या १० वर्षात २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले.

▸▸पीएम- जनमन योजना विशेष करून अशा वंचित आदिवासी वर्गापर्यंत पोहोचली आहे जे आतापर्यंत विकासाच्या कक्षेबाहेर होते. पीएम विश्वकर्मा योजनेतून १८ व्यवसायातल्या कारागीर आणि शिल्पकारांना सहय्य प्राप्त होते.

▸▸केंद्र सरकारने आपल्या पद्धतीने समर्थ केलेल्या लोकांची उर्जा आणि उत्साह समन्वयीत झाल्याने आता सरकारच्या प्रयत्नांनाही बळ लाभत आहे. यामुळे खऱ्या अर्थाने ते गरिबीतून बाहेर पडत आहेत.

▸▸७८ लाख फेरीवाल्यांना पीएम-स्वनिधीतून कर्ज सहाय्य प्रदान करण्यात आले. २.३० लाख १ फेरीवाल्यांनी यापैकी तिसऱ्यांदा कर्ज प्राप्त केले.



▸▸योजनेत सहभागी सुमारे ३१ कोटी लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड बनवण्यात आले आहे.

▸▸ उत्तम पोषण उपलब्ध करुन प्राथमिक बाल्यावस्थेत देखरेख आणि विकास यासाठी सक्षम आन्गांवादी आणि पोषण २.० अंतर्गत आंगणवाडी केंद्रांच्या सुधारणेला वेग देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ■

# देशाला रसातळाला नेणारी यूपीए सरकारची 10 वर्षे

- यूपीए सरकारच्या काळात महागाई प्रचंड वाढली.
- जीवनावश्यक वस्तूंच्या दरात सातत्याने वाढ झाल्याने २००४ ते २०१४ या १० वर्षात सर्वसामान्य माणूस महागाईने पिचून गेला होता.
- यूपीए सरकारच्या काळात बँकींग क्षेत्राकडेही मोठे दुर्लक्ष झाले. सरकारी बँकां म्हणजे आपल्या गुलाम आहेत, अशा समजातून या बँकांतून कर्जाच्या खिरापती वाटल्या गेल्याने सरकारी बँका प्रचंड अडचणीत आल्या. सरकारी बँकांच्या कर्जाचा भार केंद्र सरकारवर आला.
- यूपीए सरकारमधील उच्च पदस्थांनी सरकारी बँकांवर मोठ्या उद्योगपतींना, कंपन्यांना कर्ज देण्यासाठी दबाव आणला. या उद्योगपतींनी आणि कंपन्यांनी सरकारी बँकांचे निव्वळ व्याजापोटी ८.६ लाख कोटी रुपये थकवले होते.
- ही कर्जे देताना पुरेसे तारण घेतले गेले नव्हते. त्यामुळे या प्रचंड कर्जांची वसुली करणे बँकांना कठीण झाले होते.
- सरकारी बँकांचा तोटा वाढल्यामुळे (एनपीए) देशाची अर्थव्यवस्था संकटात आली.
- २०१३ मध्ये अमेरिकेच्या डॉलरची किंमत वेगाने वाढली. त्या काळात यूपीए सरकारने योग्य आर्थिक धोरण न आखल्याने भारतीय रुपयाची आंतरराष्ट्रीय चलन बाजारात अभूतपूर्व घसरण झाली.
- रुपयाची घसरण थांबवण्यासाठी यूपीए सरकारने वेळेत निर्णय घेतले नाहीत.
- यूपीए सरकारच्या कार्यकाळात परकीय चलन साठ्यात (गंगाजळी) विक्रमी घट झाली.
- जुलै २०११ मध्ये देशाचा परकीय चलन साठा २९४ बिलियन डॉलर एवढा होता. ऑगस्ट २०१३ मध्ये हा साठा २५६ बिलियन डॉलरपर्यंत कमी झाला. सप्टेंबर २०१३ मध्ये आगामी ६ महिने आयात करता येईल, एवढाच परकीय चलन साठा देशाकडे शिल्लक होता.
- यूपीए सरकारने २००६ ते २०१० या काळात तेल कंपन्या, खत कंपन्या आणि अन्न–धान्य महामंडळ यांच्याकडून १.९ लाख कोटीचे एवढ्या रकमेचे रोखे (ऑईल बॉण्ड) खरेदी केले. या ऑईल बॉण्डच्या व्याजापोटी हजारो कोटी रुपये केंद्र सरकारला भरावे लागले.
- केंद्र सरकारला ऑईल बॉण्ड व्याजापोटी भराव्या लागणाऱ्या रकमेचा उल्लेख दडवून ठेवला गेला. मोदी सरकारला गेल्या १० वर्षात या बॉण्डच्या व्याजापोटी गेल्या ९ वर्षात १.९३ लाख कोटी रुपये एवढी रक्कम भरावी लागली आहे. या पुढील काळात मोदी सरकारला या बॉण्डच्या व्याजापोटी आणखी १.०२ कोटी रुपये भरावे लागणार आहेत.
- यूपीए सरकारच्या काळात आर्थिक शिस्त कोळमडून पडल्याने वित्तीय तूट अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात कर्ज घ्यावे लागले.
- यूपीए सरकारच्या काळात द्रुतगती मार्ग, राष्ट्रीय महामार्ग, पूल, विमानतळ, बंदरे यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले.
- १९९८ ते २००४ या दरम्यान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या काळात २४ हजार किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले. यूपीए सरकारच्या १० वर्षात मात्र फक्त १६ हजार किलोमीटरचे राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले.
- समाज कल्याण, ग्रामीण विकास यासारख्या खात्यांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते. यूपीए सरकारच्या १० वर्षात या खात्यांसाठीची केल्या गेलेल्या तरतुदीपैकी ९४ हजार कोटी रुपये इतका निधी खर्चच केला गेला नाही. ही रक्कम तशीच पडून राहिली.
- यूपीए सरकारने देशाच्या संरक्षणाकडेही अक्षम्य दुर्लक्ष केले. राफेलसारख्या लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी सरकारकडे निधी नाही, असे त्यावेळचे संरक्षण मंत्री ए.के.अँटोनी यांनी जाहीरपणे सांगितले होते. ■

# दळणवळणातून विकासाला 'गतिशक्ती'



● रूपा दत्ता

> अर्थव्यवस्था अधिकाधिक मजबूत करण्यात दळणवळण क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्रात कार्यक्षम, शाश्वत आणि किफायतशीर पर्याय निर्माण करणे ही काळाची गरज आहे. 'पीएम गतिशक्ती योजना' आणि 'राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण' ही त्या दिशेने टाकलेली पावले आहेत.

**भारत** ही २०२५ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था व्हावी, हे उद्दिष्ट गाठण्यासाठी अलीकडच्या वर्षांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण आणि सुसंगत पावले उचलली गेली आहेत. यामधील दळणवळण क्षेत्राची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका ओळखून केंद्र सरकारने आर्थिक विस्ताराला आधार देण्यासह, व्यापारउदिमातील स्पर्धात्मकतेला चालना देण्यासाठी आणि देशभरात पुरवठा साखळी सुरळीत करण्याच्या उद्देशाने दळणवळण क्षेत्रातील पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर दिला आहे. गुंतवणुकीच्या प्रयत्नांना जोखीममुक्त करण्याबरोबरच, भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून नागरिकांचे राहणीमान सुलभ करणे आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेला चैतन्य देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

गुंतवणुकीच्या जगात गुंतवणूकदारांना नियोजन, अंमलबजावणी, वित्तपुरवठा, प्रशासकीय प्रक्रिया, राजकीय स्थिती, भूसंपादनातील आव्हाने आणि बाजारातील चढउतार अशा निरनिराळ्या आघाड्यांवर अनेक जोखमींचे सूक्ष्म मूल्यांकन करावे लागते. माहितीपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नैपुण्य प्राप्त करणे, असंख्य विचारांना एका सुसंगत धोरणात गुंफणे, गुंतवणूक अनुकूल परिस्थिती

निर्माण करणे, त्यासाठी मौल्यवान संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक असते. असे असले तरी अशा प्रकारच्या क्षेत्रांमध्ये एखाद्या प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यकाळातील जोखमीचे व्यापक स्तरावरील मूल्यांकन कमी होण्याचे आव्हान कायम असते. संपूर्ण जगभरातील देशांच्या सरकारांनी या प्रयत्नांची निकड ओळखली असून गुंतवणूक परिदृश्य जोखीममुक्त करण्याच्या उद्देशाने सक्रियपणे धोरणे राबविली जात आहेत. या दिशेने होत असलेल्या प्रयत्नांमध्ये व्यापारासाठी पोषक वातावरण निर्मिती, धोरणात्मक आणि आर्थिक स्थैर्य राखणे, दळणवळणास प्रोत्साहन देणे, नियमांची चौकट अधिक सोपी करणे, सार्वजनिक–खासगी भागीदारीला चालना देणे आणि आकर्षक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे या गोष्टींचा समावेश आहे.

पायाभूत सेवा क्षेत्र हे वाढत्या अर्थव्यवस्थेचे सार मानले जाते. गुंतवणुकीसाठी ते एक आदर्श क्षेत्र मानले जाते. आर्थिक वृद्धी आणि विकास साध्य करणाऱ्या राष्ट्रांसाठी गुंतवणुकीला चालना देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने देशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एक परिवर्तनात्मक दृष्टिकोन म्हणून पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा उपक्रम सुरू केला आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि संपूर्ण भारतात संपर्कयंत्रणा मजबूत करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब करणे हे या उपक्रमाचे उद्देश आहेत. या परिवर्तनाला चालना देणारा आणखी एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स योजना. हे दोन्ही उपक्रम एकत्रितरीत्या भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्रदीर्घ आव्हानांवर तोडगा काढण्यावर आणि क्षमतांचा पुरेपूर वापर करण्यावर भर देतात.

### पीएम गतिशक्ती बृहद आराखडा (एनएमपी)

ऑक्टोबर २०२१ मध्ये उद्घाटन झालेल्या पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा (एनएमपी) या उपक्रमाद्वारे रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि अंतर्गत जलवाहतुकीचा समावेश असलेल्या भारताच्या पायाभूत सेवांच्या जाळ्याला आधुनिक स्वरूप देऊन एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून प्रवासी आणि मालाची सुरळीत वाहतूक करणे, संपर्कयंत्रणा सुधारणे आणि वाहतुकीचा खर्च कमी करणे यावर भर दिला जात आहे. बहु–पर्यायी लॉजिस्टिक केंद्र आणि कॉरिडॉरच्या विकासाला प्राधान्य देऊन, कार्यक्षमतेला चालना देणे, वाहतूक कोंडी कमी करणे आणि डेटा आधारित निर्णयांद्वारे शाश्वत उपायांना प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे.

पीएम गतिशक्ती योजनेचा आणखी एक उद्देश म्हणजे शेवटच्या घटकापर्यंतची संपर्कयंत्रणा सुधारणे आणि पायाभूत सुविधांमधील अडथळे दूर करणे. त्यासाठी रस्ते रुंदीकरण, रेल्वेचे विद्युतीकरण आणि बंदरांचे आधुनिकीकरण यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे. भारताच्या दळणवळण क्षमता वाढविण्यासह उत्पादन, कृषी, वस्त्रोद्योग आणि ई–कॉमर्स यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित करणे हेदेखील या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. पीएम गतिशक्ती एनएमपीचा उपयोग, शाळा, रुग्णालये, कौशल्य विकास केंद्रे, अंगणवाडी केंद्रे आणि क्रीडा सुविधा केंद्रे अशा सामाजिक–आर्थिक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याच्या दृष्टीने यथोचित निर्णय घेण्यासाठी आणि त्यांच्या विद्यमान योजनांवर देखरेख ठेवण्यासाठी सामाजिक क्षेत्रातील मंत्रालयांद्वारेदेखील केला जात आहे, ज्यामुळे राहणीमान अधिक सुलभ करणे शक्य होत आहे.

पीएम गतिशक्ती एनएमपीची अंमलबजावणी करण्यासाठी संस्थात्मक चौकटीचा भाग म्हणून, मुख्य पायाभूत सुविधा मंत्रालयांच्या प्रतिनिधित्वासह एकात्मिक बहुपर्यायी नेटवर्क नियोजन समूह (एनपीजी) कार्यरत आहे. एनपीजी, मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या नियोजनासाठी एकात्मिक दृष्टिकोनातून तसेच दळणवळण कार्यक्षमता वाढवण्याच्या, शेवटच्या घटकापर्यंत संपर्कयंत्रणा पोहोचवण्याच्या आणि आर्थिक क्लस्टर्ससाठी उपयुक्तता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून परीक्षण करते. आतापर्यंत, एनपीजीच्या ६५ बैठका झाल्या आहेत आणि १२.६८ लाख कोटी रुपये किमतीच्या १३४ मोठ्या पायाभूत प्रकल्पांचे मूल्यांकन झाले आहे.

आर्थिक वर्ष २०२४–२५च्या अंतरिम अर्थसंकल्पात केलेली तीन आर्थिक रेल्वे कॉरिडॉर्सच्या अंमलबजावणीची घोषणा, पीएम गतिशक्तीच्या दूरदृष्टीचे मूर्त परिणाम अधोरेखित करते. हे निवडलेले कॉरिडॉर (१) ऊर्जा, खनिज आणि सिमेंट कॉरिडॉर, (२) बंदर संपर्कयंत्रणा



कॉरिडॉर आणि (३) उच्च वाहतूक घनता कॉरिडॉर, बहुपर्यायी संपर्क प्रदान करतील, दळणवळण कार्यक्षमतेला प्रोत्साहन देतील आणि दळणवळणाचा खर्च कमी करतील. यामध्ये उच्च घनता असलेल्या रेल्वे मार्गावरील वाहतूक कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. रस्तेमार्गाऐवजी रेल्वे आणि जलवाहतुकीचा पर्याय निवडणे उपयुक्त ठरू शकते. तसे झाल्यास एकंदर दळणवळण प्रक्रियेतील कार्बन उत्सर्जनाचे प्रमाणदेखील कमी होईल.

### राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण

राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण १७ सप्टेंबर २०२२ रोजी लागू करण्यात आले. भारताच्या दळणवळण क्षेत्राचे रूपांतर आर्थिक वाढीच्या स्पर्धात्मक आणि कार्यक्षम इंजिनात व्हावे, यासाठी हे धोरण एक सर्वसमावेशक आराखडा प्रदान करते. या धोरणाचे उद्दिष्ट एकत्रित, अडथळाविरहित, कार्यक्षम, विश्वासार्ह, हरित, शाश्वत आणि किफायतशीर असे दळणवळणाचे जाळे निर्माण करून आर्थिकवाढीला चालना देणे आणि उद्योगांमधील स्पर्धात्मकता वाढवणे हे आहे. राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरणाने दळणवळणाचा खर्च कमी करणे, दळणवळण कामगिरी निर्देशांक क्रमवारी सुधारणे, २०३० पर्यंत जगातील अव्वल २५ राष्ट्रांपैकी एक होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणे आणि कार्यक्षम दळणवळण परिसंस्थेसाठी उपलब्ध विदावर आधारित निर्णय यंत्रणा तयार करणे, ही उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

या धोरणाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी त्यामध्ये सर्वसमावेशक दळणवळण कृतियोजनादेखील अंतर्भूत आहे. डिजिटायझेशन, आधुनिक गोदामांचे मानकीकरण, व्यापार दळणवळण कार्यक्षमतेत वृद्धी, कोळसा, पोलाद, खते, अन्नधान्य, सिमेंट आणि बंदरांशी जोडणी यांसाठी क्षेत्रीय योजनेवर लक्ष केंद्रित करण्यासह सेवा सुधारणा आराखडा आणि लॉजिस्टिक पार्कच्या विकासाची सुविधा इत्यादी घटकांचा समावेश यात आहे. पीएम गतिशक्ती उपक्रम आणि राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणाचा दळणवळण धोरणावर होणारा एकत्रित परिणाम अतिशय परिवर्तनकारी आहे. हे धोरण गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला प्रोत्साहन देते, दळणवळण कार्यक्षमतेला चालना देते आणि शाश्वतता व वाहतूक कोंडीच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करते. हे दोन उपक्रम, केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना वेगवेगळ्या आघाड्यांवर एकत्र आणतात. केंद्र सरकार एक आराखडा आणि मार्गदर्शक तत्त्व प्रदान करते तर राज्य सरकार राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण आणि पीएम गतिशक्ती उपक्रमाच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावते.

**(श्रीमती रूपा दत्ता या उद्योग व अंतर्गत व्यापार, प्रोत्साहन विभागाचे (निवृत्त) मुख्य आर्थिक सल्लागार आहेत.)**

# देशात 2 लाखांपेक्षा जास्त नागरिक करोडोपती

● प्रा. नंदकुमार काकिर्डे

गेल्या पाच वर्षात देशातील करोडपती व्यक्तींची संख्या ही जवळ-जवळ दुप्पट झाली आहे. देशातील आर्थिक विषमता एका बाजूला हळूहळू कमी होत असताना दुसरीकडे व्यक्तिगत पातळीवर नागरिकांच्या वार्षिक उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली पहावयास मिळत आहे. याबाबत प्रसिद्ध झालेल्या अहवालाचा हा मनोरंजक धांडोळा.

**स्टेट** बँक ऑफ इंडिया या देशातील अग्रगण्य राष्ट्रीयकृत बँकेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका अहवालात गेल्या दहा वर्षातील करदात्यांनी भरलेल्या विवरण पत्रांचे (वार्षिक रिटर्न्स) विश्लेषण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे भारतीय करदात्यांची तपशीलवार माहिती केंद्रीय वित्त मंत्रालयाचे राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी याबाबतची आकडेवारी नुकतीच संसदेच्या सभागृहासमोर ठेवली. त्यानुसार गेल्या पाच वर्षांमध्ये देशातील करोडोपती प्राप्तीकरदात्यांची संख्या जवळजवळ दुप्पट झाली आहे. २०१९-२० या कर निर्धारण वर्षात (सेसमेंट इयर) एक कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या करदात्यांची संख्या १.०९ लाख इतकी होती. २०१८-१९ या आर्थिक वर्षात देशात एक लाखापेक्षा जास्त व्यक्तींचे उत्पन्न कोटी रुपयांपेक्षा जास्त झालेले होते. त्याच्या पुढील वर्षात म्हणजे २०२०-२१ या कर निर्धारण वर्षात करोडपती लोकांची संख्या १ लाख १९ हजार २३२ इतकी झाली होती. २०२१-२२ या कर निर्धारण वर्षात म्हणजे करोना महामारीच्या काळात थोडी कमी होऊन एक लाख २७



हजार २५६ वर पोचली होती. मात्र २०२२-२३ या करनिर्धारण वर्षात देशातील करोडपती करता त्यांची संख्या १ लाख ८७ हजार ९०५ वर गेली. मात्र त्यापुढील वर्षात म्हणजे २०२३-२४ या करनिर्धारण वर्षात एक कोटी रुपयांपेक्षा जास्त करपात्र उत्पन्न असलेल्या प्राप्तीकर करदात्यांची संख्या तब्बल २ लाख १६ हजार २१७ इतकी झाली आहे.

याचा अर्थ करोना महामारी असलेल्या दोन वर्षात म्हणजे २०१९-२० व २०२०-२१ या दोन आर्थिक वर्षांमध्ये प्राप्तिकर विवरण भरणाऱ्यांच्या संख्येमध्ये समाधानकारक वाढ म्हणजे ६.७० टक्के वाढ झाली होती. त्या पुढील वर्षात म्हणजे २०२१-२२ आर्थिक वर्षात या करदात्यांची संख्या ४७ टक्के वाढली. या वर्षात ७.५१ कोटी करदात्यांनी प्राप्तिकर विवरणपत्रे भरलेली होती. २०२३-२४ या चालू कर निर्धारण वर्षात डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत तब्बल ८.१८ कोटी कर दात्यांनी त्यांची वार्षिक विवरणपत्रे भरलेली असून त्यात नऊ टक्के इतकी भरघोस वाढ झालेली आहे. मार्च २०२४ पर्यंत हा आकडा आणखी काही कोटींनी वाढण्याची शक्यता आहे.

प्राप्तिकर खात्याने गेल्या काही वर्षात कर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेमध्ये लक्षणीय पारदर्शकता व सुटसुटीतपणा निर्माण केल्यामुळे करदात्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसते. मात्र केंद्रीय मंत्रालयाने

दरवर्षी विवरणपत्रे दाखल करणाऱ्यांच्या संख्येत म्हणजे करदात्यात कोणत्या कारणामुळे उत्पन्न वाढल्याचे कारण दिलेले नाही. तरीही आकडेवारी असे सांगते की गेल्या पाच वर्षात केवळ नागरिकांचे व्यक्तिगत पातळीवरील उत्पन्न कोटी रुपयांपेक्षा जास्त झालेले आहे व त्याचप्रमाणे विवरणपत्रे दाखल करणाऱ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ सातत्याने होताना दिसत आहे. दरवर्षी प्राप्तिकर विवरण पत्रे दाखल करणाऱ्यांची संख्या सुद्धा वाढत असल्याने निम्न मध्यम उत्पन्न वर्गातील (ज्याला लोअर मिडल इन्कम क्लास) करदात्यांची संख्या मध्यम व उच्च उत्पन्न वर्गात (म्हणजे मिडल व अप्पर इन्कम क्लास) संक्रमित झालेली आहे. त्याचप्रमाणे उच्च उत्पन्न मिळणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. पाच ते दहा लाख रुपये उत्पन्न असणाऱ्या करदात्यांची संख्या ८.१० टक्के वाढली आहे. दहा लाख ते वीस लाख रुपये उत्पन्न असणाऱ्या करदात्यांच्या संख्येत ३.८० टक्के वाढ झालेली आहे तर वीस लाख ते पन्नास लाख या दरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्या प्राप्तिकर दात्यांच्या संख्येत १.५० टक्के इतकी चांगली वाढ झालेली आहे. यातील आणखी चांगली गोष्ट म्हणजे पन्नास लाख ते एक कोटी रुपये या दरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्या करदात्यांच्या संख्येतही ०.२० टक्के झालेली आहे. त्याचप्रमाणे एक कोटी रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या करोडपती करदात्यांची संख्या ०.०२ टक्यांनी वाढलेली आहे. यातील खूप महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाच लाख ते दहा लाख रुपये या दरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्या करदात्यांची संख्या २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत तब्बल २९५ टक्क्यांनी वाढली. तसेच दहा लाख ते पंचवीस लाख यादरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्या करदात्यांची संख्या तीन पट म्हणजे २९१ टक्के वाढलेली आहे. कर निर्धारण वर्ष २०२१-२२ वर्षात देशात सात कोटी करदात्यांनी कर विवरणपत्रे भरलेली होती. ही संख्या २०२२-२३ या वर्षात ७.४० कोटींवर गेली. मात्र २०२३-२४ या करनिर्धारण वर्षात डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत ८.२० करदात्यांनी विवरण पत्रे दाखल केलेली आहेत. म्हणजे मार्च २०२४ पर्यंत त्यात लक्षणीय वाढ होणे अपेक्षित आहे. या वाढत्या आकडेवारीमुळे वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांच्या व काहीही उत्पन्न किंवा अल्प उत्पन्न असणाऱ्यांच्यातील तफावत कमी होत असल्याचा निष्कर्ष या अहवालात काढण्यात



आला आहे. या अहवालात देशातील मध्यमवर्गामध्ये लक्षणीय रित्या वाढ होत असून वाढते उत्पन्न होण्यामध्ये नागरिकांची संख्या वाढताना दिसत आहे.


त्याचप्रमाणे दहा कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या करता त्यांची संख्या गेल्या दहा वर्षात २.८१ टक्क्यांवरून २.५० टक्क्यांवर घटलेली आहे. तसेच वर्षाला १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या करदात्यांची संख्या गेल्या दहा वर्षात १.६४ टक्क्यांवरून लक्षणीयरित्या कमी झाली असून ती १.६४ टक्क्यांवरून ०.७७ टक्के इतकी खाली आलेली आहे.

देशातील नागरिकांमध्ये उत्पन्नातील असमानता मोजण्यासाठी एक गिनी को- इफिशियंट पद्धती जगभर व्यापक प्रमाणावर वापरली जाते. त्या परिणामांचा वापर करून गेल्या दहा वर्षातील उत्पन्नातील असमानता ०.४७२ टक्के कमी झाल्याचा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आला आहे. सध्या गेल्या पाच वर्षात ज्या वेगाने देशातील करदात्यांची व त्यांनी दाखल केलेल्या विवरण पत्रांच्या संख्येत वाढ होत आहे त्यानुसार ५० लाख रुपये ते एक कोटी रुपये यांच्या दरम्यान २०४६-४७ या करनिर्धारण वर्षात ०.५० टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे एक कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या प्राप्तीकर दात्यांची संख्या ०.०७५ टक्क्यांनी वाढणार आहे असाही सकारात्मक उत्पन्न वाढणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सर्वसामान्यांच्या माहितीसाठी आपले आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२३ ते ३१मार्च २०२४ असे असेल तर त्याचे करनिर्धारण वर्ष म्हणजे सेसमेंट इयर हे २०२४-२५ असे असते.

**(लेखक पुणेस्थित ज्येष्ठ अर्थविषयक पत्रकार व बँक संचालक आहेत.)**


# मोदी सरकारने अडविले पाकिस्तानला जाणारे भारताच्या हक्काचे पाणी

## रावी नदीवरील धरणाचे काम ६४ वर्षानंतर झाले पूर्ण



> १९६० च्या करारानुसार रावी नदीचे पाणी हे भारताच्या वाटणीचे पाणी आहे. काँग्रेस सरकारने १९६० ते १९९५ या ३५ वर्षात या पाण्याचा भारतातील शेतकऱ्यांना फायदा होईल असा विचारच केला नाही. शेजारच्या शत्रू राष्ट्राला चेक-मेट करण्याच्या स्ट्रॅटेजीचा भाग म्हणूनही हा विचार त्यांनी कधी केला नाही. शेतकऱ्यांची मागणी असूनही आणि डिफेन्स एक्सपर्ट्स सांगत असूनही काँग्रेसने त्याकडे हेतुपुरस्सर काणाडोळाच केला हे इकडे मला सखेद नमूद करावंच लागेल.

**पाकिस्तान** व पाकिस्तानी जनतेला कोणतीही गैरसोय होऊ नये एवढीच काँग्रेसला चिंता होती. दोन राज्यांमध्ये भांडणे लावणे व ती भांडणे वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या चालू राहतील याची काळजी घेणे, हा काँग्रेसचा जुना टूलकिट! रावीचे पाणी पाकिस्तानला देऊन समाधान न झालेल्या काँग्रेसने मग बॉर्डरवरील दोन राज्यांमध्ये भांडण लावले. काँग्रेसने १९९५ मध्ये धरणाची पायाभरणी केली आणि लगेच, धरण कसे बांधायचे यावरून पंजाब सरकार आणि जम्मू-काश्मीर सरकारमध्ये भांडणे लावून ते काम बंद पाडले! १९९५ पासून २०१४ पर्यंत कधी काँग्रेसने तर कधी त्यांच्या पंजाब व काश्मीरमधील मित्रपक्षांनी हे धरण काही होऊ दिले नाही. अर्थात, १९६० पासून २०१४ पर्यंत तब्बल ५४ वर्षे रावी नदीचे पाणी पाकिस्तान निवांत वापरत राहिला! भारताने पाकिस्तानला दणका दिला आहे. भारताने आता रावी नदीचे पाणी अडवले आहे, यामुळे पाकिस्तानी शेतकऱ्यांना फटका बसणार आहे. तब्बल ४५ वर्षांपासून वाट पहिली जात असलेले रावी नदीवरील शाहपूर कंडी धरण अखेर पूर्ण झालं असून त्यामुळे कित्येक वर्षांपासून पाकिस्तानात वाहून जाणारं



पाणी बंद करण्यात आले आहे. शाहपूर कंदी धरणाचे काम पूर्ण झाले आहे, त्यामुळे रावी नदीच्या पाण्याचा पाकिस्तानकडे जाणारा प्रवाह पूर्णपणे थांबला आहे. शाहपूर कंदी हे धरण जम्मू-काश्मीर आणि पंजाबच्या सीमेवर आहे. या धरणामुळे पाकिस्तानात जाणारे ११५० क्युसेक पाणी आता जम्मू-काश्मीरमधील शेतकऱ्यांना मिळणार आहे. यामुळे कठुआ आणि सांबा जिल्ह्यातील ३२ हजार हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केला जाणार आहे. शाहपूर कंदी धरणाचे काम हे गेल्या तीन दशकांपासून सुरू होते. आता २९ वर्षांनंतर त्याचे काम पूर्ण झाले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९६० मध्ये सिंधू जल करार झाला होता. यानुसार रावी, सतलज आणि बियास नद्यांच्या पाण्यावर भारताचा अधिकार आहे, तर सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांच्या पाण्यावर पाकिस्तानचा अधिकार असेल असे ठरवण्यात आले होते.सिंधू जल कराराअंतर्गत शाहपूर कंदी धरण बांधण्यात आले आहे. आता हे पाणी भारतातील शेतकरी वापरू शकणार आहेत. पूर्वी हे पाणी लखनपूर धरणातून पाकिस्तानकडे जात असे. मात्र आता हे पाणी रोखण्यात आले आहे. त्यामुळे पाकिस्तानला आता रावी नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून द्यावे लागणार आहे.


शाहपूर कंदी धरणाच्या बांधकामाची पायाभरणी तत्कालीन पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांनी १९९५ मध्ये केली होती. मात्र पंजाब आणि जम्मू-काश्मीर सरकारमधील वादांमुळे या धरणाचे काम थांबले होते. त्यानंतर २०१४ मध्ये केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी हा मुद्दा पंतप्रधान नरेंद्र मोदींसमोर ठेवला होता. मोदींच्या मध्यस्थीनंतर हे वाद मिटले होते. त्यानंतर २०१८ मध्ये या धरणाचे काम पुन्हा सुरू झाले होते. आता हे काम पूर्ण झाले असून या धरणामुळे लाखो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. जागतीक बँकेच्या देखरेखीखाली १९६० मध्ये झालेल्या सिंधू जल कराराअंतर्गत रावीच्या पाण्यावर भारताचा विशेष अधिकार आहे. पंजाबच्या पठाणकोट जिल्ह्यात शाहपूर कंडी बॅरेज जम्मू काश्मीर आणि पंजाब यांच्यातील वादामुळे अडकून पडला होता. मात्र मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात पाणी पाकिस्तानात वाहून जात होतं. सिंधू जल कराराअंतर्गत रावी, सतलज आणि व्यास नद्यांच्या पाण्यावर भारताचा संपूर्ण अधिकार आहे. तर सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांच्या पाण्यावर पाकिस्तानचा अधिकार आहे. **(शेष पान ३३ वर)**

## पंजाबच्या शेतकऱ्यांना धरणाचे पाणी मिळणार

**२०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आले आणि २०१५ मध्ये या प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. २०१८ मध्ये केंद्राने पाऊल उचलले आणि या धरणाला 'राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प' घोषित केले. अखेरीस, कराराच्या ६४ वर्षांनंतर, शाहपूरकंडी धरण तयार झाले असून यापुढे पाकिस्तानला जाणारे भारताच्या हक्काचे रावीचे पाणी अडविण्यात आले आहे. हे पाणी आता पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्येच सिंचनासाठी वापरले जाईल एवढंच नाही. हे धरण बनण्याआधी पंजाबात जे पाणी येत होतं, ते प्रामुख्याने सतलज नदीचे होते. पंजाब आणि हरियाणा मधील करारानुसार यातील सतलजचे पाणी पंजाबने हरियाणालाही द्यायचे आहे. परंतु पंजाबलाच सतलजचे पाणी कसेबसे पुरत असल्याने ते हरियाणाला त्यांचा पूर्ण वाटा देत नसत. त्यावरून या दोन राज्यांत गेली अनेक वर्षे भांडणे सुरू आहेत. आता शाहपूरकंडी डॅमचे पाणी सतलज-यमुना लिंक कॅनल ला जोडलेले असल्याने हरियाणाला मुबलक पाणी मिळणार असून पंजाब-हरियाणा तंटा पण सुटणार आहे! विरोधी पक्ष आणि त्यांची भाडोत्री लेफ्ट-लिबरल गँग ज्या काळात मोदींवर ते पंजाबच्या शेतकऱ्यांच्या विरोधात आणि जम्मू-काश्मीरचे अधिकार काढून घेत असल्याचा आरोप करत होते, त्याच गेल्या चार-पाच वर्षांत हे कार्य मोदींनी केले आहे!**

# पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशभर सुरू करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री - सूर्यघर मोफत वीज योजने'त तीन किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून प्रत्येक कुटुंबाला ७८ हजार रुपयांपर्यंत सबसिडी देण्यात येणार आहे.



**घराच्या** छतावर रूफ टॉप सोलर वीजनिर्मिती प्रकल्प बसवून सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व ती वीज घरी वापरून विजेची गरज पूर्ण करायची, अशी ही योजना आहे. यामध्ये गरजेपेक्षा अधिक वीजनिर्मिती झाल्यावर वीजबिल शून्य येते अर्थात वीज मोफत मिळते व त्यासोबत जास्तीची वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते.

केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविणाऱ्या वीज ग्राहकांना दोन किलोवॅट क्षमतेपर्यंत प्रत्येक किलोवॅटला तीस हजार रुपये अनुदान मिळणार आहे. तर अधिक एक किलोवॅट म्हणजे तीन किलोवॅट क्षमतेची सिस्टिम बसविणाऱ्या ग्राहकाला एका किलोवॅटला अठरा हजार रुपये अधिकची सबसिडी मिळेल. अर्थात एक किलोवॅटसाठी तीस हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी साठ हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून थेट मिळेल. वीज ग्राहकांनी कितीही क्षमतेची रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविली तरी जास्तीत जास्त एकूण अनुदान प्रती ग्राहक ७८ हजार रुपये इतके निश्चित केलेले आहे. दि. १३ फेब्रुवारी २०२४ नंतर रूफ टॉप सोलरसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलवर अर्ज दाखल केलेल्या सर्व ग्राहकांना केंद्र सरकारकडून नव्या दराने अनुदान मिळेल.


महाराष्ट्रात वीज ग्राहकांना रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी महावितरण मदत करते. ग्राहकांनी https://pmsuryaghar.gov.in या राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे आहे. पीएम सूर्यघर नावाचे मोबाईल पही यासाठी उपलब्ध आहे. देशभरात एक कोटी घरांसाठी ही योजना सुरू केलेली असून राज्यातील ग्राहकांनी योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्यावा.

एक किलोवॅट क्षमतेच्या रूफ टॉप सोलर सिस्टिममधून दररोज सुमारे चार युनिट अर्थात दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. महिना दीडशे युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्या कुटुंबाला दोन किलोवॅटपर्यंतच्या क्षमतेची रूफ टॉप सोलर सिस्टिम पुरेशी आहे. दरमहा दीडशे ते तीनशे युनिट वीज वापर असणाऱ्या कुटुंबासाठी दोन ते तीन किलोवॅट क्षमतेची सिस्टिम पुरेशी ठरते.

केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या आधारे वीज ग्राहकांना रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविता याव्यात यासाठी महावितरणने यापूर्वीच यशस्वी प्रयत्न केले आहेत. राज्यात मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०२४ पर्यंत रुफ टॉप सोलर सिस्टिम बसविलेल्या वीज ग्राहकांची संख्या १,२७,६४६ झाली असून त्यांची एकूण वीजनिर्मिती क्षमता १९०७ मेगावॅट झाली आहे. ■

# सौरऊर्जेने उजळतील घरे

हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी 'मिशन लाइफ' या जागतिक उपक्रमाचा पुढाकार असो, पंचामृताद्वारे जगाला मार्ग दाखवणे असो किंवा आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचा उपक्रम असो, भारताने पुढाकार घेतला आहे. जगाचे नेतृत्व करत, ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी भारत निसर्गातून हरित ऊर्जा मिळवण्याच्या दिशेने सातत्याने काम करत आहे. या संदर्भात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत २२ जानेवारी रोजी एक कोटी कुटुंबांच्या छतावर सौर ऊर्जा पॅनेल बसविण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री सूर्योदय योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.



**अयोध्येतून परतल्यानंतर मी पहिला निर्णय घेतला तो म्हणजे आपले सरकार १ कोटी घरांच्या छतावर छप्पर सौर यंत्रणा बसविण्याचे उद्दिष्ट ठेवून प्रधानमंत्री सूर्योदय योजना सुर करणार आहे. यामुळे केवळ गरीब आणि मध्यम वर्गाचे वीज शुल्कच कमी होणार नाही तर ऊर्जा क्षेत्रात भारत आत्मनिर्भरही होईल.**

**● नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**भारतात** २०१४ मध्ये केवळ २० गिगावेट अक्षय ऊर्जा क्षमता होती, त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ पर्यंत १०० गिगावॅटचे उद्दिष्ट साध्य करण्याचे जे उद्दोष्ट ठेवले होते ते वेळेआधीच पूर्ण करून जगाला एक नवीन दिशा दाखवली. यापूर्वी २०१५ मध्येच त्यांनी जगाला एक सूर्य, एक ग्रिड ही संकल्पना दिली आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची पायाभरणी केली, ज्यात ११६ सदस्य आणि स्वाक्षरी करणारे आहेत. २०३० पर्यंत रेल्वे हरित करण्याचे उद्दिष्ट आहे तर २०७० पर्यंत शून्यकार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट ठेवून भारत पुढे जात आहे. भारताकडे जगातील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी स्थापित सौर ऊर्जा क्षमता आहे. यास पुढे नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी रोजी अयोध्येतून परतल्यानंतर लगेचच सात लोक कल्याण मार्ग येथील त्यांच्या निवासस्थानी १ कोटी घरांच्या छतावर सौर ऊर्जा बसविण्याचे उद्दिष्ट ठेवून 'प्रधानमंत्री सूर्योदय योजना'सुरू करण्याचा निर्णय घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, जगातील सर्व भक्तांना नेहमीच सूर्यवंशी भगवान श्री राम यांच्या तेजातून ऊर्जा मिळते. अयोध्येतील प्राणप्रतिष्ठेच्या शुभ प्रसंगी, माझा संकल्प आणखीनच दृढ झाला आहे की भारतातील लोकांच्या घराच्या छतावर त्यांची स्वतःची सौर छप्पर प्रणाली असावी. निवासी क्षेत्रातील ग्राहकांना मोठ्या संख्येने सौर छप्पर प्रणालीचा अवलंब करण्यासाठी प्रेरित करण्यासाठी एक व्यापक राष्ट्रीय मोहीम सुरू करण्याचे निर्देश पंतप्रधान मोदी यांनी दिले आहेत. ■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एक कोटी आयुष्मान कार्ड वितरणाचा प्रारंभ

- महाराष्ट्रातील ५.५ लाख महिला बचतगटांना ८२५ कोटी रुपयांचा निधी
- विविध रस्ते, रेल्वे आणि सिंचन प्रकल्पांचे केले लोकार्पण



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यवतमाळ येथे ४९०० कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या रेल्वे, रस्ते आणि सिंचनाशी संबंधित विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन आणि लोकार्पण केले. या कार्यक्रमात त्यांनी पीएम किसान आणि इतर योजनांतर्गत लाभांचे देखील वितरण केले. पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील एक कोटी आयुष्मान कार्ड वितरणाचा शुभारंभ केला आणि ओबीसी प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी मोदी आवास घरकुल योजना देखील सुरू केली. त्यांनी दोन रेल्वे सेवांना हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. पंतप्रधानांनी यवतमाळ शहरात पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुतळ्याचे देखील अनावरण केले. या कार्यक्रमात देशभरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**पंतप्रधानांनी** गरीब, युवा, महिला आणि शेतकरी या चार सर्वात मोठ्या प्राधान्यक्रमाच्या बाबींचा पुनरुच्चार केला. या चौघांच्या सक्षमीकरणामुळे प्रत्येक कुटुंब आणि संपूर्ण समाजाचे सक्षमीकरण सुनिश्चित होईल. या चौघांच्या सक्षमीकरणासोबत पंतप्रधानांनी आजच्या कार्यक्रमातील प्रकल्पांचा संबंध जोडला. त्यांनी शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधा, गरिबांसाठी पक्की घरे, ग्रामीण महिलांना आर्थिक मदत आणि युवा वर्गाच्या भवितव्यासाठी पायाभूत सुविधांचा उल्लेख केला. शेतकरी, आदिवासी आणि गरजूंना आधीच्या सरकारांच्या कार्यकाळात दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्यातील गळतीवर टीका करत पंतप्रधानांनी या सर्वांच्या विपरित आजच्या काळात केवळ एक बटण दाबून

# यवतमाळ येथे केंद्र सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांना वाटप



**महाराष्ट्रातील लाभार्थी– वर्षा रवींद्र सोनावणे, पंचशीला विश्वंभर शेळके, पार्वता दादाराव पारधी, कांचन महेश पांडे, राधिका प्रशांत लखतकर, हर्षा प्रवीण धोत्रे, ज्योती दिलीप तायडे, आशा दादाराव तोयाम, नीलिमा रमेश पायघण.**

पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत सुमारे २१,००० कोटी रुपयांचे वितरण होत असल्याची बाब अधोरेखित केली आणि ही मोदी यांची गॅरंटी असल्याकडे निर्देश केला. गरिबांना त्यांच्या हक्काचा वाटा आज मिळत आहे. महाराष्ट्रातील डबल इंजिन सरकारची डबल गॅरंटी अधोरेखित करत पंतप्रधान म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वेगळे ३८०० कोटी रुपये मिळाले असून त्यामुळे या राज्यातील सुमारे ८८ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला आहे.

पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत देशातील ११ कोटी शेतकऱ्यांना ३ लाख कोटी रुपये मिळाले आहेत. यापैकी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३०,००० कोटी रुपये आणि यवतमाळमधील शेतकऱ्यांच्या खात्यात ९०० कोटी रुपये जमा झाले आहेत. ऊसाच्या एफआरपीमध्ये प्रतिक्विंटल ३४० रुपयांची वाढ केल्याची देखील त्यांनी माहिती दिली. त्यांनी अन्न साठवणुकीसाठी जगातील सर्वात मोठ्या योजनेचा देखील उल्लेख केला जी अलीकडेच भारत मंडपम येथे सुरू करण्यात आली.

विकसित भारताच्या निर्मितीसाठी ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे अत्यावश्यक आहे, असे पंतप्रधान म्हणाले. खेड्यापाड्यात राहणाऱ्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांचा त्यांनी उल्लेख केला. मागील सरकारच्या काळात गावांमधील दुष्काळसदृश परिस्थितीत पिण्याच्या तसेच सिंचनाच्या पाण्याच्या टंचाईबद्दल बोलताना त्यांनी सांगितले, २०१४ पूर्वी १०० पैकी केवळ १५ कुटुंबांना नळाने पाणीपुरवठा व्हायचा, ही कुटुंबे गरीब, दलित आणि आदिवासी समुदायातील होती, पाणीटंचाईमुळे महिलांना बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागत होते, असे ते पुढे म्हणाले. मोदींच्या 'हर घर जल' या हमीमुळे १०० पैकी ७५ कुटुंबांना ४-५ वर्षांत नळाचे पाणी उपलब्ध झाले. महाराष्ट्रात ५० लाखांहून कमी नळ जोडण्या होत्या , ही संख्या आता १.२५ कोटी झाल्याची माहिती त्यांनी दिली. मोदींची हमी म्हणजे आश्वासनाच्या पूर्ततेची हमी.

पूर्वीच्या काळातील प्रलंबित १०० सिंचन प्रकल्पांचा संदर्भही त्यांनी दिला. त्यापैकी ६० प्रकल्प गेल्या १० वर्षांत पूर्ण झाले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. शेतकरी कुटुंबांच्या दु:खामागे कोण आहे हे जाणून घ्यायचा हक्क विदर्भातील शेतकऱ्यांना आहे. २६ प्रलंबित सिंचन प्रकल्प महाराष्ट्रातील होते, त्यापैकी १२ प्रकल्प सरकारने पूर्ण केले आहेत आणि इतर प्रकल्पांवरही काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. ५० वर्षांनंतर पूर्ण झालेला निळवंडे धरण प्रकल्प, कृष्णा कोयना आणि टेंभू प्रकल्प आणि गोसीखुर्द प्रकल्पाची उदाहरणे पंतप्रधानांनी दिली. पंतप्रधान कृषी सिंचाई आणि बळीराजा संजीवनी योजनेंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्याला आज ५१ प्रकल्प समर्पित करण्यात आले.

खेड्यापाड्यातून लखपती दीदी तयार करण्याच्या मोदींच्या हमीबद्दल ते म्हणाले की १ कोटी महिलांना लखपती करण्याचे उद्दिष्ट आधीच गाठले गेले आहे आणि यंदाच्या अर्थसंकल्पात लखपती दीदींची संख्या ३ कोटीपर्यंत वाढवण्याची योजना आहे. बँकेकडून ८ लाख कोटी रुपये आणि केंद्र सरकारच्या ४०,००० कोटी रुपयांच्या विशेष निधीसह १० कोटींहून अधिक महिला बचत गटांशी संबंधित आहेत. याचा महाराष्ट्रातील लाखो महिलांना फायदा झाला आहे. यवतमाळ जिल्ह्यात महिलांना अनेक ई-रिक्षाही दिल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली. या कामाबद्दल पंतप्रधानांनी महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन केले. त्यांनी नमो ड्रोन दीदी योजनेचाही उल्लेख केला. सरकारकडून या योजनेद्वारे महिलांना ड्रोन पायलट म्हणून प्रशिक्षण दिले जात आहे आणि कृषी वापरासाठी ड्रोन देखील दिले जातील.

शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति पंतप्रधानांच्या वचनबद्धतेचे आणखी एक उदाहरण दाखवून देणारे पाऊल उचलत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) अंतर्गत २१,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा १६ वा हप्ता यवतमाळ येथील सार्वजनिक कार्यक्रमात लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जारी करण्यात आला. याद्वारे ३ लाख कोटींहून अधिक रक्कम,११ कोटींहून अधिक शेतकरी कुटुंबांना हस्तांतरित करण्यात आली आहे.

पंतप्रधानांनी 'नमो शेतकरी महासन्मान निधी'चा ३८०० कोटी रुपयांचा दुसरा आणि तिसरा हप्ताही वितरित केला, ज्याचा महाराष्ट्रातील सुमारे ८८ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ मिळाला. ही योजना महाराष्ट्रातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांना प्रतिवर्षी ६००० रुपये अतिरिक्त रक्कम प्रदान करते. पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील ५.५ लाख महिला बचत गटांना ८२५ कोटी रुपयांचा परिवर्ती निधी वितरित केला. ही रक्कम राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत भारत सरकारने प्रदान केलेल्या फिरत्या निधीव्यतिरिक्त आहे. बचत गटांना परिवर्ति पद्धतीने पैसे देण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रामीण स्तरावर महिलांच्या नेतृत्वाखालील सूक्ष्म-उद्योगांना प्रोत्साहन देऊन गरीब कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न वाढवण्यासाठी हा फिरता निधी दिला जातो. सर्व सरकारी योजनांच्या १०० टक्के संपृक्ततेचे त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी कल्याणकारी योजनांच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी पंतप्रधानांनी आणखी एक पाऊल म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात एक कोटी आयुष्मान कार्डचे वितरण सुरू केले. पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील ओबीसी प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी मोदी आवास घरकुल योजना सुरू केली. या योजनेत आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंत १० लाख घरे बांधण्यात येणार आहे. पंतप्रधानांनी योजनेच्या २.५ लाख लाभार्थ्यांना ३७५ कोटी रुपयांचा पहिला हप्ता हस्तांतरित केला. पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ भागांना लाभ देणारे अनेक सिंचन प्रकल्प राष्ट्राला समर्पित केले. हे प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना आणि बळीराजा जल संजीवनी योजना अंतर्गत २७५० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून विकसित केले आहेत.


पंतप्रधानांनी महाराष्ट्रात १३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक रेल्वे प्रकल्पांचे उद्घाटनही केले. प्रकल्पांमध्ये वर्धा-कळंब ब्रॉडगेज लाईन (वर्धा-यवतमाळ-नांदेड नवीन ब्रॉडगेज लाईन प्रकल्पाचा भाग) आणि नवीन आष्टी-अमळनेर ब्रॉडगेज लाईन (अहमदनगर-बीड-परळी नवीन ब्रॉडगेज लाईन प्रकल्पाचा भाग) यांचा समावेश आहे. नवीन ब्रॉडगेज लाइन्समुळे विदर्भ आणि मराठवाडा या विभागांचा रेल्वे संपर्क सुधारेल आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांनी दोन रेल्वे सेवांना हिरवा झेंडा दाखवला. यामध्ये कळंब आणि वर्धा यांना जोडणाऱ्या रेल्वे सेवा आणि अमळनेर आणि नवीन आष्टीला जोडणाऱ्या रेल्वे सेवेचा समावेश आहे. या नवीन रेल्वे सेवेमुळे रेल्वे संपर्क सुधारण्यास मदत होईल आणि या भागातील विद्यार्थी, व्यापारी आणि दैनंदिन प्रवाशांना फायदा होईल. पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील रस्ते क्षेत्राला बळकट करण्यासाठी अनेक प्रकल्प राष्ट्राला समर्पित केले. प्रकल्पांमध्ये एनएच-९३० च्या वरोरा-वणी विभागाच्या चौपदरीकरणाचा समावेश आहे; साकोली-भंडारा आणि सालईखुर्द-तिरोरा या महत्त्वाच्या रस्त्यांसाठी रस्ते उन्नतीकरण प्रकल्प यात समाविष्ट आहे. या प्रकल्पांमुळे कनेक्टिव्हीटी सुधारेल, प्रवासाचा वेळ कमी होईल आणि प्रदेशातील सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल. यवतमाळ शहरातील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुतळ्याचे उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले. ■

# 'तेथे' मंदिरच होते

● डॉ. के. के. मोहम्मद

> त्यातल्या तीन-चार जणांना पुरातत्त्वशास्त्राचे थोडेफार ज्ञान होते. असे असले तरी पुरातत्त्वशास्त्राचा जो परीघ आहे, त्याबाबत मात्र ते सर्व अज्ञानीच होते. त्यामुळे प्रसिद्ध पुरातत्त्व शास्त्रज्ञ डॉ. बी. आर. मणी यांच्यासारख्यांपुढे तर ते केवळ खुजेच होते. बाबरी मशीद कृती समितीचे प्रतिनिधित्व करणारे जेएनयू व अलिगड विद्यापीठातील जे कुणी होते, त्यांना पुरातत्त्व शास्त्राचे ज्ञान नव्हते. त्यामुळे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे जे शास्त्रज्ञ होते, त्यांनी या लोकांना काही किंमतच दिली नाही. पुरातत्त्व विभागाला सत्य आणि निष्पक्षपणा सर्वोपरी होता.

**दरम्यान,** विहिंपशी जवळीक सांगणार्या पुरातत्त्व विभागाच्या एका अधिकाऱ्याने डॉ. मणी यांचे स्थान बळकवण्याचा प्रयत्न केला. यात तो यशस्वी झाला असता तर मंदिराचे अस्तित्व सिद्ध करण्याच्या उत्साहात अयोध्या एका वेगळ्या वादात सापडली असती. परंतु, पुरातत्त्व विभाग नमला नाही आणि डॉ. मणी यांना पदावरून काढण्यात आले नाही. पुरातत्त्व विभागाने पुन्हा एकदा आपला निष्पक्षपणा सिद्ध केला. केंद्रात भाजपा सत्तेत असूनही पुरातत्त्व विभागाने जवाहर प्रसाद नामक भाजपा आमदाराचा, मंदिराचा विस्तार करण्याचा प्रयत्न मोठ्या धाडसाने थांबविला, म्हणून बाबरी मशीद समितीचे एक प्रमुख नेते सय्यद शहाबुद्दीन यांनी तत्कालीन केंद्रीय मंत्री अनंत कुमार यांना पत्र लिहून पुरातत्त्व विभागाचे कौतुक



केले. हे शासकीय पत्र पुरातत्त्व विभागाच्या महासंचालकांनी मला अग्रेषित केले. मी सय्यद शहाबुद्दीन यांना सविस्तर उत्तर लिहिले. त्यात अयोध्या मुद्याचाही उल्लेख होता. मी लिहिले की, प्रो. बी. बी. लाल यांच्या नेतृत्वात मी अयोध्या उत्खननात भाग घेतला होता आणि बाबरी मशिदीच्या खाली मंदिराचे अवशेष मी पाहिले आहेत. मी त्यांना विनंती केली की, त्यांनी हे सत्य समजून घ्यावे आणि अयोध्या प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने मुसलमानांमध्ये अनुकूलता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. त्यांनी मला आश्वस्त केले की, पुढील बैठकीत मुस्लिम नेत्यांसमोर मी ही वस्तुस्थिती मांडून चर्चा करीन. बैठकीनंतर त्यांनी मला कळविले की, मशीद हिंदूंना सोपविण्यास एकही जण तयार नाही. नंतर माझी त्यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली. परंतु, बाबरी मशीद हिंदूंना सोपविण्यास शहाबुद्दीन तयार नव्हते.

भेटीनंतर परत येताना मी खोलवर चिंतन करीत होतो. जर भारत एक मुस्लिमबहुल सेक्युलर देश असता (तसा मुस्लिमबहुल देश कधीही सेक्युलर राहूच शकत नाही) आणि जर एखाद्या मुस्लिम नेत्याने मंदिराच्या (जे एक राष्ट्रीय स्मारक आहे) परिसरात अवैधपणे मशीद बांधण्याचा प्रयत्न केला आणि एका हिंदू अधिकार्याने त्याला विरोध केला, तर किती मुसलमान त्या अधिकार्याच्या पाठीशी उभे राहतील? भारताच्या पंथनिरपेक्ष-वृत्तीची ही महानता आहे. अपवाद दाखविता येतील- की काही ठिकाणी मुसलमानांची सामूहिक हत्या करण्यात आली वगैरे. परंतु, सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला असता मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो- हिंदूंमधील जातीयवाद हा काही त्यांचा मूळ स्वभाव नाही. बरेचदा एखाद्या घटनेची प्रतिक्रिया म्हणून तो बाहेर येतो. गोधराच्या घटनेच्या

संदर्भातही हे लागू आहे. जर्मनीच्या एका आंतरराष्ट्रीय उत्खननाच्या चमूसोबत मी एकदा ओमानमधील सलाला गावी गेलो होतो. जमिनीत गाडल्या गेलेल्या अल बलिद शहराचे उत्खनन करायचे होते. तिथे मला काही केरळी लोक भेटले. ते सिमी या प्रतिबंधित संघटनेचे समर्थक होते. त्यांनी मला त्यांच्या एका कार्यक्रमाला आमंत्रित केले. त्यातील काहींना माझे अयोध्येबाबतचे विचार माहीत होते. परंतु मी त्यांच्यासमोर काही अटी ठेवल्या. मी येईन व बोलीन. माझ्या विचारांवर तुम्ही प्रश्न विचारू शकता. परंतु मी इथे जर्मनीच्या निमंत्रणावरून आलेलो असल्यामुळे तिथे कुठलीही अप्रिय घटना घडावयास नको. शिस्त पाळली गेली पाहिजे आणि विरोधी मताचा आदर केला पाहिजे. त्यांनी मान्य केले आणि मी तिथे रामजन्मभूमीचा विषय मांडला. भाषणाच्या प्रारंभी मी इस्लामच्या सहिष्णू काळाविषयी बोललो. पवित्र कुराणातील मी देत असलेले संदर्भ पाहून त्यांना आश्चर्य वाटले. नंतर मी उत्खनन व त्यात सापडलेल्या शिल्पाकृतींबाबत सविस्तर बोललो. त्यांनी अतिशय लक्षपूर्वक ते ऐकले. माझ्या भाषणाचा समारोप मी असा केला :

''मुस्लिमांना मक्का आणि मदिना जसे महत्त्वाचे आहे, तसेच हिंदूंना अयोध्या. मक्का किंवा मदिना दुसऱ्यांच्या ताब्यात असल्याचा मुस्लिम विचारदेखील करू शकणार नाही. हिंदूबहुल देश असतानाही त्याचे मंदिर मुस्लिमांच्या ताब्यात असल्याचे पाहून भारतातील हिंदू जो अपमान सहन करीत आहे, त्या हतबल हिंदूंच्या आक्रोशाकडे मुसलमानांनी लक्ष दिले पाहिजे. हिंदूंची श्रद्धा आहे की, बाबरी मशीद रामाचे जन्मस्थान आहे आणि या जागेचा पैगंबर मोहम्मद यांच्याशी काहीही संबंध नाही. या स्थानाचा सहाबीस किंवा खुलाफौर रसयिदिन्सशी तसेच तबिऊन किंवा औलिया वा सलाफ-अस-सलिहशी काहीही संबंध नाही. केवळ मोगल राजा बाबराशी संबंध आहे. मग त्या मशिदीला एवढे महत्त्व का म्हणून द्यायचे?'' नंतर मी माझ्या लहानपणची एक घटना त्यांना सांगितली- ''जेरुसलेमची बैतुल मुकद्दस ज्यूंच्या हातात गेली, तेव्हा आम्ही कोदुवल्लीच्या जुम्मा मशिदीत गोळा झालो होतो आणि अल्लाहने बैतुल मुकद्दस आमच्या ताब्यात द्यावी म्हणून आक्रोश केला होता. बैतुल मुकद्दस दुसर्याच्या ताब्यात गेली म्हणून जी वेदना आमची होती, तीच वेदना सामान्य हिंदूंची आहे. मी सुशिक्षित आणि प्रगतिशील हिंदूंबाबत बोलत नाहीये. मी उत्तर भारतातील सामान्य हिंदूंबाबत बोलत आहे. जे श्रीरामाच्या दर्शनासाठी कडाक्याच्या थंडीत, अंगावर सदरादेखील न घालता, अनवाणी पायाने, कितीतरी किलोमीटर अंतर चालत येतात, त्यांच्याबाबत बोलत आहे. आम्ही त्यांच्या वेदना, त्यांच्या धार्मिक भावनांचा थोडा तरी आदर करू शकणार नाही का?'' उपस्थित श्रोतृवृंद विचारात पडला होता. मी पुढे म्हणालो- स्वातंत्र्यानंतर मुस्लिमांसाठी एक स्वतंत्र देश वेगळा करून देण्यात आला. त्या वेळी भारताला हिंदू राष्ट्र म्हणून सहजच घोषित करता आले असते. परंतु, गांधीजी, नेहरू, पटेल, आझाद यासारखे महान नेते असल्यामुळे त्यांनी हे घडू दिले नाही. मुस्लिम अल्पसंख्यकांना स्वतंत्र देश दिल्यानंतरही त्यांनी भारताला सेक्युलर देश म्हणून घोषित केले. तुम्हाला ही अशी हृदयाची विशालता जगात कुठेही आढळणार नाही. या कृतीसाठी पंचा नेसणाऱ्या त्या वृद्ध मानवाला सेक्युलॅरिझमच्या वेदीवर आपले प्राण अर्पण करावे लागले. उपस्थितांना विचार करण्यास उसंत मिळावी म्हणून मी थोडा थांबलो. त्यानंतर भाषण आटोपत मी म्हटले- ''भारत जर मुस्लिमबहुल भूमी असती तर तो सेक्युलर राहिला असता का?'' समोरून काहीच उत्तर आले नाही. मी म्हणालो, ''नसता राहिला. भारत जर मुस्लिमबहुल देश असता आणि अल्पसंख्य हिंदूंना स्वतंत्र देश दिल्यावर, त्याने आपणहून स्वत:ला सेक्युलर म्हणून घोषित केलेच नसते. ही उदार वृत्ती हिंदुत्वात स्वभावत:च आहे. सहिष्णुता हा हिंदुत्वाचा स्वभाव आहे. आम्ही या स्वभावाला समजून घेतले पाहिजे. आम्ही या मानसिकतेचा आदर केला पाहिजे. भारतात हिंदूऐवजी दुसऱ्या कुठल्या धर्माच्या लोकांची बहुसंख्या असती, तर मुसलमानांची काय दशा झाली असती, याचा तुम्ही विचार केला तर बरे होईल. प्रत्येकाने या अशा ऐतिहासिक वस्तुस्थितीला समजून घेतले पाहिजे आणि तडजोडीसाठी तयार राहायला हवे. तरच आम्ही खर्या अर्थाने सेक्युलर देश बनू शकतो. मी या विचारांना 'उलट चिंतन'(रीव्हर्स थिंकिंग) असे म्हणतो. तुम्ही हिंदू असाल तर तुम्ही मुसलमान असल्याची कल्पना करा आणि समस्येकडे बघा. **(भाग क्र.३)**

**श्री. मोहम्मद हे निवृत्त पुरातत्त्व संचालक (उत्तर भारत) आहेत.**

**(अनुवाद- विशाल फुटाणे)**




**शेवगाव-पाथर्डी (जि.नगर)- उपस्थिती-** खा. सुजय विखे-पाटील, आ. मोनिका राजळे, तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, शहराध्यक्ष अजय भंडारी, सचिन वायकर, शुभम गाडे, विष्णुपंत अकोलकर, मंगल कोकाटे आदी.




**चिखली (जि.बुलढाणा)- उपस्थिती-** आ. श्वेता महाले-पाटील, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद देशमुख, उद्योजिका सीता मोहिते, ॲड. प्रा.राम हरपाळे, राजेंद्र काळे, तालुकाध्यक्ष सुनील पोफळे, शहराध्यक्ष पंडितदादा देशमुख, सुधीर तांबट, सिंधु तायडे, मनीषा सपकाळ आदी.



**चिपळूण (जि.रत्नागिरी)- उपस्थिती-** बेटी बचाओ, बेटी पढाओ प्रदेश संयोजिका डॉ.शुभा पाध्ये, अंजली साळवी, पायल कबरे, श्रुती ताम्हणकर, स्नेहा जोशी, डॉ.छाया यादव, शिल्पा मराठे, सुजाता साळवी, सुयोगा जठार, स्नेहा रहाटे,




**चंद्रपूर– नमो चषक स्पर्धा पारितोषिक वितरण– उपस्थिती–** वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, प्रख्यात अभिनेत्री नेहा पेंडसे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, श्रीनिवास जंगम, रामपाल सिंह, नामदेव आसुटकर आदी.



**दक्षिण सोलापूर– ओबीसी मोर्चातर्फे उज्वला गॅसचे वाटप– उपस्थिती–** ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विवेक खिलारे, ओबीसी मोर्चा सरचिटणीस सुरेश राठोड, सुनिल कळके, तालुका सरचिटणीस पंकज पाटील, वैशाली हरे, सावित्री राठोड आदी.




**मालेगाव–धुळे व नंदुरबार लोकसभा मुस्लिम बहुल बूथ प्रमुखांशी संवाद– उपस्थिती–** खा. सुभाष भामरे, अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, धनराज विसपुते, एजाज शेख, अकबर शहा, झाकीर पठाण, इब्राहिम शेख, तौसिफ खाटीक, शैलेंद्र अचके, नितीन भोसले, सुरेखा भुसे आदी.



**ता.सुरगाणा, जि.नाशिक– उपस्थिती–** कळवण सुरगाणा विधानसभा अध्यक्ष रमेश थोरात, जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण उत्तर ललिता कुवर आदी.



**लासलगाव– उपस्थिती–** बूथ प्रमुख प्रकाश पवार, भोलादादा, जिल्हा सरचिटणीस महिला मोर्चा उत्तर ग्रामीण स्मिता कुलकर्णी, अनुसूचित जाती जमाती मंडल अध्यक्ष लक्ष्मण खलसे, लासलगाव मंडल अध्यक्ष निलेश सालाकाडे आदी.



**नंदुरबार– उपस्थिती–** प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, सीमा शरद पाटील, अंगणवाडी सेविका सुशीला पाटील, आशासेविका रंजना ठाकरे, बचत गट अध्यक्ष वर्षा पाटील, दिपाली पाटील, कोकिला पाटील आदी.



**मु. गुळहळ्ळी गाव, ता: तुळजापूर, जिल्हा: धाराशिव– उपस्थिती–** सोशल मीडिया प्रदेश संयोजक प्रकाश गाडे, सोशल मिडिया जिल्हा संयोजक सचिन घोडके, कल्याण बिराजदार, मुकुंद नाईक, बुथप्रमुख खंडू हलकंबे, उमेश चव्हाण, तानाजी बनछेरे, नवनाथ पटणे, बालाजी पाटील, गजेंद्र हलकंबे, बालाजी बाबर आदी.



**उंबरठाण (ता.सुरगाणा, जि.नाशिक)– उपस्थिती–** एन.डी.गावीत, मंडल अध्यक्ष राजेंद्र निकुळे, सुनिल भोये, हर्षवर्धन गावीत, जयराम भोये आदी.

# आ. राजेंद्र पाटणी यांचे निधन



**वाशिम** जिल्ह्यातील आमदार राजेंद्र पाटणी यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. ते ५९ वर्षाचे होते. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी अखंडपणे प्रयत्न करणारे आमदार अशी त्यांची ख्याती होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आ.पाटणी यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार राजेंद्र पाटणी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.'' विधानसभेतील माझे सहकारी राजेंद्र पाटणीजी यांचे आज निधन झाले. गेल्या काही महिन्यांपासून ते आजाराशी झुंज देत होते. ते या संकटातून बाहेर पडतील, अशी आम्हा सर्वांना आशा होती. पण आज त्यांची प्राणज्योत मालवली,'' असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे. ग्रामीण प्रश्नांची जाण असलेला लोकप्रतिनिधी भाजपाने गमावला आहे. पश्चिम विदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा कायम पुढाकार असायचा. सिंचनाचे प्रश्न मार्गी लागले पाहिजे, म्हणून ते सतत आग्रही असायचे. त्यांचे निधन ही माझी वैयक्तिक हानी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. हे दुःख सहन करण्याची शक्ती कुटुंबीयांना मिळावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## मोदी सरकारने अडविले पाकिस्तानला जाणारे पाणी

**(शेष पान २२ वरून)**

१९९७ मध्ये पंजाब आणि जम्मू-काश्मीर सरकारांनी पाकिस्तानात जाणारे पाणी रोखण्यासाठी रंजीत सागर धरण आणि डाउनस्ट्रीम शाहरूर कंडी बॅरेज तयार करण्यासाठीच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या कराराअंतर्गत जम्मू-काश्मीरचे तात्कालीन मुख्यमंत्री शेख मोहम्मद अब्दुल्ला आणि पंजाबचे प्रकाश सिंह बादल यांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या.१९८२ मध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या योजनेची पायभरणी केली होती, त्यानंतर १९९८ पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. रणजीत सागर धरणाचे बांधकाम २००१ मध्ये पूर्ण झाले होते, शाहपूर कंडी बॅरेज तयार होऊ शकलं नाही आणि रावी नदीचं पाणी पाकिस्तानला मिळत राहिलं. २००८ मध्ये शाहपूर कंडी योजनेला राष्ट्रीय योजना घोषित करण्यात आलं होतं. मात्र बांधकाम २०१३ मध्ये सुरू झालं. २०१४ मध्ये पंजाब आणि जम्मू काश्मीर यांच्यात वादा सुरू झाल्याने ही योजना पुन्हा लांबत गेली. अखेर २०१८ मध्ये केंद्र सरकारच्या मध्यस्थीमुळे दोन्ही राज्यांमध्ये करार झाला, यानंतर हे धरण बांधण्यास सुरूवात झाली. यामुळे पाकिस्तानात जाणारं पाणी आता जम्मू काश्मीरमधील दोन प्रमुख जिल्हे कठुआ आणि सांबा येथे मोठा प्रदेश सिंचनाखाली येणार आहे. ११५० क्यूसेक पाणी आता ३२,००० हेक्टर जमीनीच्या सिंचनासाठी वापरले जाईल. या धरणामुळे तयार होणाऱ्या वीजेचा २० टक्के लाभ जम्मू काश्मीरला मिळणार आहे. ५५.५ मीटर उंचीचं हे शाहपूर कंडी धरण एक बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्पाचा भाग आहे, ज्यामध्ये एकूण २०६ मेगावॅट क्षमतेचे दोन जलविद्युत प्रकल्प आहेत. हे रणजीत सागर धरण प्रकल्पाच्या खाली ११ किमी अंतरावर रावी नदीवर बांधले आहे. धरणाचे पाणी जम्मू-काश्मीरशिवाय पंजाब आणि राजस्थानलाही मदत करेल. शाहपूर कंदी बॅरेज पंजाब आणि जम्मू-काश्मीरच्या सीमेवर आहे. यापूर्वी पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या ११५० क्युसेक पाण्याचा आता जम्मू-काश्मीर क्षेत्राला फायदा होणार आहे. कठुआ आणि सांबा जिल्ह्यांतील ३२ हजार हेक्टरपेक्षा जास्त जमिनीला याचा फायदा होईल. त्यानंतर हे पाणी सिंचनासाठी वापरले जाईल. सिंचन आणि जलविद्युत निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या शाहपूर कंदी बॅरेज प्रकल्पाला गेले तीन दशके अनेक आव्हानांचा सामना करावा लागला आहे. आता २९ वर्षांनंतर शाहपूर कंदी बॅरेज प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. ■




**प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष बसवराज पाटील, रश्मी बागल यांचा पक्ष प्रवेश– उपस्थिती–** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा, खा.सुधाकर शृंगारे, खा. रणजितसिंह नाईक–निंबाळकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, आ. राणा जगजितसिंह पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, हर्षवर्धन पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आदी.







**सांगली– मिरजमधील अनेक मुस्लीम कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सांगलीचे पालकमंत्री सुरेश खाडे, आ. गोपीचंद पडळकर, माजी नगरसेवक राजू गोपाल आचारी, सामाजिक कार्यकर्ते नितेश कांबळे, बजरंग दल मिरज शहरप्रमुख विनायक ठोंबरे, माजी नगरसेवक साजिद अली पठाण, फारूक जमादार.



**प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, आ. अभिमन्यू पवार, आ. संजय सावकारे, प्रदेश प्रवक्ते कुणाल टिळक, प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे बापूसाहेब काने, वाल्मिकी संघटनेचे मुंबई अध्यक्ष मोहन कंडार, नितीन धांडे, नितीन माळी, श्रीनिवास भाऊसंगा, विश्वनाथ दुर्लेकर, गणेश साळुंखे, संतोष बसुदे, सागर दोलत्तडे, प्रवीण वाडे, सतीश खरटमल आदी.

# 'संकल्प पत्रा'साठी जनतेकडून सूचना




**लोकसभा** निवडणुकीसाठी काढण्यात येणाऱ्या संकल्प पत्रासाठी (जाहीरनामा) सामान्य जनतेच्या सूचना मागविण्याच्या अभियानाचा प्रारंभ राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या हस्ते नुकताच दिल्लीत झाला. यासाठी पक्षातर्फे 'विकसित भारत–मोदी की गारंटी' रथ काढण्यात येणार आहे. या रथाला राष्ट्रीय अध्यक्षांनी हिरवा झेंडा दाखविला. सामान्य माणसाला भारतीय जनता पार्टीकडून आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकारकडून काय अपेक्षा आहेत, हे कळावे तसेच यातील चांगल्या सूचनांचा संकल्पपत्रात समावेश करावा या हेतूने हे अभियान सुरु करण्यात आले आहे. 'विकसित भारत–मोदी की गारंटी'हा रथ (व्हिडीओ व्हॅन) सर्व लोकसभा मतदारसंघांत फिरणार असून त्याद्वारे सामान्य माणसाला आपल्या सूचना भाजपा नेतृत्वाकडे कळविता येणार आहेत. तसेच ९०९०९०२०२४ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊनही आपल्या सूचना, अपेक्षा कळविता येणार आहेत. या रथाद्वारे मोदी सरकारने केलेल्या विकास कामांची माहितीही सामान्य माणसापर्यंत पोहचवली जाईल. या व्हिडीओ व्हॅनच्या माध्यमातून संपूर्ण देशातून १५ मार्चपर्यंत एक कोटी सूचना मागविल्या जाणार आहेत. त्यातील उपयुक्त सूचनांचा पक्षाच्या संकल्पपत्रात समावेश केला जाणार आहे. या रथाच्या माध्यमातून २५० ठिकाणी समाजातील वेगवेगळ्या घटकांशी संवाद साधला जाणार आहे. या संवादातून आलेल्या सूचनांचाही समावेश संकल्प पत्रामध्ये केला जाणार आहे. या खेरीज 'नमो ॲप'मध्येही सामान्य जनतेला सूचना पाठविण्यासाठीही स्वतंत्र विभाग उपलब्ध आहे. त्याचाही वापर करता येऊ शकतो. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर नेहमीच सामान्य माणसाशी, लाभार्थी वर्गाशी थेट संवाद साधण्यावर भर दिला आहे. या संवादातून सामान्य माणसाला केंद्र सरकारच्या कारभाराबद्दल असलेला अनुभव कळतो. यासाठीच पंतप्रधान मोदी यांनी 'मन की बात' हा कार्यक्रम सुरु केला आहे. पक्षाच्या जाहीरनाम्यात काय असावे यासाठी सामान्य माणसांचेही मत जाणून घेण्याचा अभिनव उपक्रम 'सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास' या पंतप्रधान मोदीजींच्या संकल्पनेचाच भाग आहे. ■

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com